# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०७ डिसेंबर, २०१६ / अग्रहायण १६, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **शालेय शिक्षण, क्रीडा आणि युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास आणि वक्फ मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण, अन्न आणि औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री** | |
| **(३)** | **पर्यावरण मंत्री** | |
| **(४)** | **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५२**

---

### आजिवली (ता पनवेल, जि.रायगड) येथील अदानी कंपनीच्या गोदामामधील खाद्यतेलाच्या अवैध साठयावर टाकण्यात आलेला छापा

**(१) * ६९७०८ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आजिवली (ता. पनवेल, जि.रायगड) या गावालगत अदानी कंपनीच्या मालकीच्या गोदामामध्ये अदानी विल्मर या खाद्यतेलाच्या साठयावर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी छापा टाकून सुमारे ९४ लाख रुपये किंमतीचा अवैध साठा जप्त केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर साठयातील काही तेल शासकीय वैद्यकीय प्रयोग शाळेत तपासणीकरीता पाठविण्यात आले होते, त्याचा अहवाल शासनाला प्राप्त झाला आहे काय, असल्यास, त्या अहवालात नमूद करण्यात आलेल्या प्रमुख बाबी कोणत्या, सदर तेल भेसळयुक्त तसेच तेलाच्या पॅकींगवर लिहिण्यात आलेल्या मजकुरानुसार त्या तेलामध्ये सर्व गुणधर्म आढळून आले आहेत काय,
(३) तसेच या तेलाचे उत्पादन कधी करण्यात आले होते व त्याचा वापर किती दिवसांत करणे आवश्यक होते याबाबतचा तपास करण्यात आला आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कंपनीवर तसेच संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे. अन्न व औषध प्रशासनातर्फे दि. २९/०९/२०१६ रोजी मे. अदानी विल्मर लि., आजिवली, ता. पनवेल, जि. रायगड या पेढीची तपासणी करण्यात आली. तपासणीच्या वेळी Blended edible vegetable oil (Fortune Vivo) या खाद्यतेलाच्या पाकीटावर नमूद करण्यात आलेला तेलातील घटक व त्यांचा शरीरावर होणा-या परिणामाबाबतचा मजकुर दिशाभूल करणारा असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे Blended edible vegetable oil (Fortune Vivo) या तेलाचे ५ नमुने व Physically Refined Rice Brand Oil (Fortune) या तेलाचे ४ नमुने विश्लेषणासाठी घेण्यात येऊन सदर तेलाचा रुपये ९४, ६६,१४५/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे.
(२) विश्लेषणासाठी ताब्यात घेण्यात आलेले नमुने पुढील तपासणीसाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे पाठविण्यात आले होते. त्याचा विश्लेषण अहवाल दि. ०९/११/२०१६ रोजी प्राप्त झाला असून Physically Refined Rice Brand Oil (Fortune) या तेलाच्या नमुन्यात ॲसीड व्हॅल्यू मानदापेक्षा जास्त असल्याचे तर Blended edible vegetable oil (Fortune Vivo) या तेलाच्या पाकीटावर नमूद करण्यात आलेला मजकूर ग्राहकांची दिशाभूल करणारा असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(३) सदर तेलाचे उत्पादन जुलै, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ या कालावधीत करण्यात आल्याचे तसेच खाद्यतेलाच्या पॅकींगवर त्याचा वापरण्यायोग्य कालावधी ९ महिने नमूद करण्यात आल्याचे तपासणी दरम्यान निदर्शनास आले.

(४) Blended edible vegetable oil (Fortune Vivo) या तेलाच्या पाकीटावर नमूद करण्यात आलेला मजकूर ग्राहकांची दिशाभूल करणारा असल्याने याप्रकरणी उत्पादकाला अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ च्या कलम २४ अंतर्गत नोटीस पाठविण्यात आली असून, त्यावर व मानदाप्रमाणे नसणा-या खाद्यतेलावर तपासाअंती न्यायनिर्णय खटले दाखल करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वसई (जि.पालघर) तालुक्यात शिधावाटप धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याबाबत

**(२) * ७१४५६ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यातील शिधावाटपाचे धान्य काळ्या बाजारात खुलेआम विकले जात असल्याची तक्रार काही जागरुक नागरीकांनी स्थानिक पोलिसांकडे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत विरार (ता.वसई) पूर्व भागातील शिवणसई गावाच्या जागरुक नागरीकांनी १३ ते १४ पोती शिधावाटपाचे धान्य भरलेले एमएच-४८-टी-९७८ या क्रमांकाचे वाहन चालकासहित पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने पोलिसांनी किती रुपयांचा शिधावाटपाचा माल टेम्पोतून जप्त केला व सदरहू काळाबाजार प्रकरणी संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) रास्त भाव दुकानदार शिवनसई, ता. वसई, जि.पालघर येथील श्री.चंद्रकांत काथेड जाधव व पिक-अप टेम्पोचे चालक व मालक श्री.राजाराम केवलराम पटेल या दोघांवर जिवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये विरार

पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १६.०९.२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून रुपये ८,४००/- इतक्या किंमतीचा गहू व रुपये ३,५०,०००/- किंमतीचा क्रमांक एम.एच.४८/टी९७८ पिकअप टेम्पो जप्त करण्यात आलेला आहे. सदर रास्तभाव दुकानाचा परवाना दिनांक ११.११.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित केला असून तेथील शिधापत्रिका दुसऱ्या दुकानास जोडण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे हळदपाडा (ता. डहाणू, जि. पालघर) येथील आदिवासी लाभार्थ्यांना निकृष्ट गहू वितरीत केल्याबाबत**

**(३) * ६६९०२ श्री.अमित घोडा (पालघर), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हळदपाडा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील आदिवासी लाभार्थ्यांना अंत्योदय योजनेअंतर्गत डहाणू तालुक्याच्या पुरवठा विभागाने गहू निकृष्ट दर्जाचा असल्याचे माहित असूनही रेशन दुकानदारांना दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास वितरीत केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी कार्ड धारकांनी सदर गहू फेकून दिला असून गोदामपाल, डहाणू यांना दिनांक १ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्र देऊन पुरवठा अधिका-यांची चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार पुरवठा करणा-या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) रास्तभाव दुकानदाराकडे निकृष्ट दर्जाचा गहू सापडल्याने सदर दुकानाचा परवाना निलंबित करण्यात आला आहे. सदर गहू बदलून देण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पालघर जिल्हयातील वीटभट्ट्यांभोवती चिमणी उभारण्याच्या अटीबाबत**

**(४) * ६९९१३ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने बांधकामात ‘प्लायॲश’ पासून तयार झालेल्या विटांचा वापर करण्याचा आदेश दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी पासून अंमलात असून पालघर जिल्हयात वीट भट्टी व्यवसाय करणारी किमान ५ हजार कुटुंबे असून जवळपास सात ते आठ हजार विटभट्टी उभारल्या जातात व प्रत्येक वीटभट्टी भोवती चिमणी उभारणे शक्य होत नसल्याने मजुरांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औष्णिक वीज केंद्रातून ‘प्लाय ॲश’ आणण्याचा वाहतूक खर्च परवडत नाही तसेच १००% ‘प्लाय ॲश’ च्या विटा ठिसूळ आणि कुमकुवत होतात असे वीटभट्टी व्यवसायिकांचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालघर जिल्हयातील तसेच राज्यातील कुंभारांचा व्यवसाय धोक्यात आला असल्याने कुंभार समाजाने जिल्हाधिकारी, पालघर यांचे मार्फत शासनास माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हे खरे आहे.

(४) शासनाने म.प्र.नि.मंडळामार्फत दि.२६.०८.२०१६ रोजी निर्गमित केलेल्या अधिसुचनेनुसार, महाराष्ट्र राज्यातील पारंपारिक विटभट्टया (स्थाननिश्चिती व उद्योग उभारणी) नियम, २०१६ प्रसारित केले आहेत. सदर अधिसुचनेच्या नियमानुसार, जे विटभट्टीधारक ९ X ४ X ६ इंच आकाराच्या एकावेळी २५,००० नगांपेक्षा जास्त विटांची निर्मिर्ती करीत असतील, तसेच ९ X ४ X ३ इंच आकाराच्या एकावेळी ५०,००० नगांपेक्षा जास्त विटांची निर्मिती करीत असतील,

अशा विटभट्टीधारकांनी म.प्र.नि.मंडळाचे संमतीपत्र घेणे बंधनकारक राहील. तथापि यापेक्षा कमी उत्पादन असल्यास संमतीपत्राची आवश्यकता नाही. या सर्व विटभट्टीधारकांनी पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्भूत वने व पर्यावरण विभाग, भारत सरकार यांनी पारित केलेल्या दिनांक २२ जुलै, २००९ व १८ नोव्हेंबर, २००९ च्या राष्ट्रीय हवा गुणवत्ता मानकांचे व त्यामध्ये नमुद केलेल्या अटींचे पालन करणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

(५) प्रश्न् उद्‌भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील राष्ट्रीय पेयजलाची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(५) * ७०७३१ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या नियोजन शून्य कारभारामुळे जिल्हा वार्षिक योजना व राष्ट्रीय पेयजल योजनेचा मिळून सुमारे ११ कोटी रुपयांचा निधी अखर्चित राहिला असल्याने राष्ट्रीय पेयजल योजनेची कामे बंद असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे स्थानिक लेखा विभागामार्फत लेखा परिक्षण सुरु असून या अधिकाऱ्यांना माहिती देण्यासाठी व दप्तर दाखविण्यासाठी पाणीपुरवठा विभागाकडे कर्मचारीच नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली आहे तसेच राष्ट्रीय पेयजल योजनांची कामे करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे सहाय्यक लेखाधिकारी हे वैद्यकीय रजेवर असल्याने त्यांच्याऐवजी अर्थविभागातील कनिष्ठ लेखाधिकारी यांची सेवा उपलब्ध करून घेण्यात आली. त्यांच्याकडुन लेखा परिक्षणास माहिती देणे व दप्तर

उपलब्ध करून देवून सन २०१४-१५ चे स्थानीक निधी लेखापरीक्षणाचे कामकाज पुर्ण करून घेण्यात आले आहे.

राष्ट्रीय पेयजल योजनेचा सन २०१६-१७ मध्ये प्राप्त संपूर्ण निधी खर्च करण्यात आला आहे.तसेच जिल्हा वार्षिक योजनेचा सन २०१५-१६ चा अखर्चित निधी राष्ट्रीय पेयजल योजनेसाठी खर्च करण्यास परवानगी मिळण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत मागणी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**शेटफळे (जि. सांगली) प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेबाबत**

**(६) * ६८५९१ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेटफळे (जि. सांगली) प्रादेशिक नळपाणी पुरवठा योजनेचे पाणी माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान बंद करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे करगणीसह पाच गावात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाली असल्याने सदर गावांनी पाण्याच्या टँकरची मागणी करुनही त्यांना पाणीपुरवठा करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

सन २०१५-१६ मध्ये अत्यल्प पाऊस झाल्यामुळे योजनेचा उद्‌भव कोरडा पडल्याने दि.२२.७.२०१६ ते दि.९.१०.२०१६ पर्यत योजनेचा पाणी पुरवठा बंद होता.

(2) हे खरे नाही.

(3) सदर कालावधीत मौ.करगणी व मौ.शेटफळे या गावांना खाजगी टँकरद्‌वारे पाणी पुरवठा करण्यात आला. मौजे शेटफळेसाठी सदर कालावधीत खाजगी विहीर अधिग्रहण करण्यात आली. तसेच पावेवाडी, तळेवाडी या गावांमध्ये स्वतंत्र पाणी

पुरवठा योजनेद्वारे पुरेसे पाणी उपलब्ध होते. माळेवाडी या गावाला खाजगी स्त्रोतांद्वारे पाणी पुरवठा करण्यात आला आहे.

टेंभू उपसा सिंचन योजनेचे पाणी बनपुरी येथील कचरेवस्ती तलांवात आलेने सदर प्रादेशिक नळपाणी पुंरवठा योजना दि.१०.१०.२०१६ पासून कार्यन्वित करण्यात आलेली होती. परंतु दि. २८.११.२०१६ पासून योजनेचे पंप नादुरुस्त झाल्याने याजनेतून होणारी पाणी पुरवठा बंद आहे. सदरचे पंप तात्काळ दुरुस्त करुन पाणी पुरवठा पुर्ववत करण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांच्या सांडपाणी वाहिन्या फुटल्याबाबत**

**(७) * ६५७६७ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोजा (ता.पनवेल, जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील ९८० कारखान्यांतून सोडण्यात येणाऱ्या रसायनयुक्त सांडपाण्याची प्रक्रीया करण्यासाठी तळोजा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प प्लांट नं.जी-८/ टी-२४ बंद असल्यामुळे या सांडपाणी प्रकल्पातून औद्योगिक कंपनीतून येणाऱ्या रसायनयुक्त सांडपाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता प्रदुषित सांडपाणी नदीमध्ये सोडण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणतीही प्रक्रिया न करता सोडण्यात आलेल्या प्रदुषित सांडपाण्यामुळे नदीतील पाणी दुषित झाल्याने मासे मृत झाले असून परिसरातील शेती व बागायतीसाठी पाणी वापरणे योग्य नसल्यामुळे तसेच लहान मासेमारी व्यवसायिकांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त कारखान्यांचे सांडपाणी वाहुन नेणाऱ्या वाहिन्या जीर्ण झाल्या असून अनेक ठिकाणी फुटल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येवून पसरलेल्या दुर्गंधीमुळे खैरणे, ढोगरयाचापाडा, देवीचापाडा, तोंडरे व वांवजे येथील नागरिकांना श्वसनाचे त्रास, गुदमरणे, अंगाला खाज येणे, कपडयांना दुर्गंधी येणे इत्यादी

आजारांचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित कंपनीविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच जुन्या व जीर्ण झालेल्या सांडपाणी वाहुन नेणाऱ्या वाहिन्या बदलण्यासाठी व बंद असलेला तळोजा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प प्लान्ट नं.जी ८/टी-२४ सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधुन निर्माण होणाऱ्या औद्योगिक सांडपाण्यावर तळोजा सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पात प्रक्रिया केली जाते. तसेच या प्रकल्पातुन प्रक्रियाकृत सांडपाणी हे बंदीस्त पाईपलाईनद्वारे वाघविली येथे खाडीपट्ट्यात सोडण्यात येते.

(२) हे खरे नाही.

मत्स्य विभाग यांचेकडून प्राप्त अहवालानुसार नदीतील मासे मृत झाल्याबाबत वा परिसरातील लहान मासेमारी व्यावसायिकांचे नुकसान झाल्याबाबत परिसरातील स्थानिक मच्छिमार अथवा मच्छिमार सहकारी संस्थेकडून कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त झालेली नाही.

त्याचप्रमाणे, तालुका कृषी अधिकारी यांचेकडून प्राप्त अहवालानुसार शेतीचे नुकसान झाल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) हे अंशत: खरे आहे.

(४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून औद्योगिक वसाहतीमध्ये सांडपाणी वाहिनीचे सर्वेक्षण करुन कार्यकारी अभियंता म.औ.वि. महामंडळ यांना सांडपाणी वाहिनीत दुरुस्ती करण्याबाबत प्रस्तावीत निर्देश दिनांक ३०/०७/२०१६ रोजी पारीत करण्यात आले आहेत.

(५) सांडपाणी वाहुन नेणाऱ्या वाहिन्या जुन्या झाल्याने नवीन वाहिन्यांचे काम म.रा.औ.वि. महामंडळातर्फे प्रगतीपथावर आहे.

तळोजा सामुहीक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पास दि. २०/०९/२०१६ रोजी प्रस्तावित आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सामुहिक प्रक्रिया सयंत्रणेची तपासणी वेळोवेळी केली जाते व तपासादरम्यान सयंत्रणा सुरु असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प सुरू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मुख्यमंत्री पेयजल योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत**

**(८) * ६५२१२ श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी केंद्र शासनाने राबविलेल्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेच्या कार्यक्रमासाठी केंद्राने निधीचे वितरण बंद केल्यामुळे राज्य शासनाने 'मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजना' सुरू करण्याचे निश्चित करून त्यासाठी दिनांक ७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास पाणीपुरवठा आणि स्वच्छता विभागाने शासन निर्णय जाहिर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू शासन निर्णयानुषंगाने सन २०१६-१७ ते २०१९-२०२० या ४ वर्षांच्या कालावधीत एकूण १ हजार १०० योजना राबविण्याचे योजिलेले असतानाही, अद्यापी सदरहू योजनेच्या अंमलबजावणीस सुरूवात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेअंतर्गत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१६ पर्यंत विभागवार किती योजना सुरु करण्यात वा मंजूरी देण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, सदरहू योजनेची विनाविलंब अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत निधी वितरण बंद केलेले नसून काही अपवाद वगळता नवीन योजना घेण्यास मनाई केलेली आहे. त्यामुळे राज्य शासनाने राज्यातील ग्रामीण जनतेस शुध्द व पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने दि.०७ मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये "मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम" राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

(२), (३) व (४) सदर कार्यक्रमांतर्गत सन २०१६-१७ ते २०१९-२० या ४ वर्षाच्या कालावधीत १००३ योजना नव्याने राबविण्याचे, बंद पडलेल्या ८३ प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्याचे व ५३१ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची देखभाल दुरुस्ती प्रस्तावित आहे.

मा. मंत्री (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील समितीच्या दि.३० ऑगस्ट, २०१६ रोजीच्या बैठकीत परिशिष्ट-अ मधील नव्याने घ्यावयाच्या सर्व नळ पाणीपुरवठा योजनांच्या व्यवहार्यता तपासणी अहवालाना तत्वत: मंजूरी देण्यात आली आहे.

तसेच खालील ०८ नळ पाणी पुरवठा योजनांना अंतिम प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.

| अ.क्र. | योजना | किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| १ | जालना जिल्हयातील १७६ गांवे प्रादेशिक ग्रीड नळ पाणीपुरवठा योजना | २३४४१.२९ |
| २ | मौ.रनाळा-येरखेडा (ता.कामटी, जि.नागपूर) प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना | १७८६.३६ |

| | | |
|---|---|---|
| ३ | बल्लारपूर तालुक्यातील १८ गांवे (जि. चंद्रपूर) प्रादेशिक ग्रीड नळ पाणीपुरवठा योजना | ३५७८.०६ |
| ४ | मूल तालुक्यातील २४ गांवे (जि. चंद्रपूर) प्रादेशिक ग्रीड नळ पाणीपुरवठा योजना | ४६००.०० |
| ५ | मौ. तळोधी-बाळापूर (ता. नागभिड, जि. चंद्रपूर) नळ पाणीपुरवठा योजना | ५८४.६८ |
| ६ | मौ. चापानेर व २ गांवे (ता. कन्नड, जि. औरंगाबाद) प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना | ५८३.१२ |
| ७ | मौ. मांजरी (ता. हवेली, जि. पुणे) नळ पाणीपुरवठा योजना | ४१७०.०४ |
| ८ | मौ. फुरसुंगी-उरुळी देवाची (ता. हवेली, जि.पुणे) नळ पाणीपुरवठा योजना | ७२८८.०७ |
| | | ४६०३१.६२ |

यारव्यतिरिक्त प्रधान सचिव (पाणीपुरवठा व स्वच्छता) यांचे अध्यक्षतेखालील तांत्रिक समितीद्वारे परिशिष्ट-अ मधील नव्याने घ्यावयाच्या १४ योजनांना व परिशिष्ट-ब मधील पुनरुज्जीवित करावयाच्या ०८ प्रादेशिक योजनांना मान्यता देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात दूषित पाणी पुरवठा होत असल्याबाबत**

**(९) * ६८४८१ श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ५ तालुक्यांमध्ये माहे जुलै, २०१६ व ऑगस्ट, २०१६ मध्ये

वा त्यादरम्यान घेतलेल्या १३४९ पाणी नमुन्यांमध्ये १४४ पाणी नमुने दूषित आढळले,  हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दूषित पाण्यामुळे जिल्हयातील ग्रामीण भागातील ५९० जणांना कावीळ, गॅस्ट्रो, कॉलरा व जुलाब या आजारांची लागण झाली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर भागातील नागरिकांना शुध्द पाणी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) हे अंशत: खरे आहे.

ठाणे जिल्हयात माहे जानेवारी, ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत कावीळ, गॅस्ट्रो, जुलाब या आजारांची एकूण ५८० व्यक्तींना लागण झाली होती. तथापि, मुत्यु झालेला नाही.

(३) विभागामार्फत संबंधित ग्रामपंचायतींना पिण्याचे पाणी साठयाचे तात्काळ शुध्दीकरण करुन घेणे, ग्रामपंचायतीच्या वतीने गावात दवंडी देणे, पाणी उकळून व गाळून घेणे, वाटप करण्यात आलेल्या मेडिक्लोरचा वापर करणे इत्यादी सूचना देण्यात आल्या. संपूर्ण जलवाहिन्या स्वच्छ करुन पाणी गळती बंद केली व ब्लिचींग पावडरचा वापर करणेबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात आली. सद्यस्थितीत शूध्द पाणी पुरवठा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अन्न व औषध प्रशासनाने भेसळयुक्त बर्फी व मावा जप्त केल्याबाबत

**(१०) * ६६०७१ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा),**

**श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गणेशोत्सवाच्या कालावधीमध्ये सुमारे २३ लाख ५५ हजार रुपये किंमतीची ८ हजार किलो भेसळयुक्त बर्फी जप्त करण्यात आली असून याच कालावधीमध्ये मुंबई परिसरातही विविध ठिकाणी छापे टाकून १३ लाखांचे १० हजार लिटर खाद्यतेल, ६१ हजारांचा खवा, १ लाख १९ हजार रुपयांच्या ३१३.४ किलोग्रॅम शुध्द तुपाच्या नावाखाली विकले जाणारे अन्नपदार्थ अन्न व औषध प्रशासनाने जप्त केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, कल्याण व अंबरनाथ (जि.ठाणे) येथील दोन मिठाई दुकानांमधून अन्न व औषध प्रशासन विभागाने छापा टाकून साडे सहा लाखांचा भेसळयुक्त मावा जप्त केल्याची माहिती दिनांक ७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली व कल्याण (प.) मधील पप्पू मावावालाकडून ५६८ किलो बनावट स्पेशल बर्फी ताब्यात घेण्यात आली आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच अन्नपदार्थात होत असलेल्या भेसळीवर कायमस्वरूपी प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) गणेशोत्सवाच्या काळात प्रशासनाने राबविलेल्या मोहीमेत राज्यातील विविध भागातून एकूण १४ प्रकरणांत रूपये १३,६०,५००/- किंमतीची १४८८२ किलो बर्फी भेसळीच्या संशयावरून जप्त करण्यात आली.

या कालावधीत मुंबई विभागात तीन प्रकरणांत रू. ९,११,०४०/- किमतीचा ५६९१ किलो बर्फीचा साठा जप्त करण्यात आला. तर खाद्य तेलाचा रू. ४६२४०/- किमतीचा ५४२ किलो साठा भेसळीच्या संशयावरून जप्त करण्यात आला. तसेच गाईच्या शूध्द तुपाचे एकूण ६ नमुने घेण्यात येऊन रू. १,१७,११९/- किमतीचा २४४ किलो साठा जप्त करण्यात आला.

(२) दिनांक ०७/०९/२०१६ रोजी मे. पप्पु मावावाला, कल्याण (प) या पेढीची तपासणी करून १) स्पेशल बर्फी (राधे), २) बर्फी (कृष्णा) या दोन अन्न पदार्थांचे नमुने घेऊन एकूण रूपये १,७३,२००/- एवढ्या किमतीचा ७७६ किलो बर्फीचा साठा अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत जप्त करण्यात आला.

तसेच दिनांक १६/०८/२०१६ रोजी मे. मुकेश मावावाला, अंबरनाथ या पेढीची तपासणी करून १) स्पेशल बर्फी (राधे), २) स्पेशल बर्फी (कृष्णा) या दोन अन्न पदार्थांचे नमुने घेऊन एकूण रूपये ०४,०१,९००/- एवढ्या किमतीचा १५१६ किलो बर्फीचा साठा अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६ अंतर्गत जप्त करण्यात आला.
(३) उक्त प्रकरणी प्रशासनाने चौकशी केली असून नियमातील तरतूदीप्रमाणे खटले/न्यायनिर्णय स्वरूपातील कारवाई घेण्यात येते. उक्त प्रकरणांना कायमस्वरूपी बंदी घालण्यासाठी ग्राहक प्रबोधनासाठी प्रशासनातर्फे शिबिरे आयोजित करण्यात येतात. तसेच प्रशासनातर्फे नियमित स्वरूपाची तपासणी मोहीम राबविली जाते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वाशी (जि. उस्मानाबाद) येथील जलशुध्दीकरण प्रकल्प बंद असल्याबाबत**

**(११) * ६६०९६ श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाशी (जि.उस्मानाबाद) शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावावरील जलशुध्दीकरण केंद्र गत १० वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जलशुध्दीकरण केंद्र बंद असल्याने पाण्यावर प्रक्रिया न होता दूषित व दुर्गंधीयुक्त पाणी पुरवठा शहरात केला जात असल्यामुळे नागरिकांना अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा मंत्री यांच्याकडे दिनांक २६ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे. मार्च, २०१२ पासून जलशुध्दीकरण केंद्र बंद आहे.
(२) नाही. जलशुध्दीकरण केंद्र बंद असलेतरी जलशुध्दीकरण केंद्रातील पाणी उचलून ते उंच सलोह टाकीद्वारे पाणी पुरवठा करताना त्यामध्ये ब्लिचिंग पावडरचा वापर करुनच पाणी निर्जतुक करुन पुरविण्यात येत आहे.

(३) खरे आहे.

(४) सदर जलशुध्दीकरण केंद्र दुरुस्त करणेसाठी नगर पंचायतीच्या सभेमध्ये मंजूरी देण्यात आली असून जलशुध्दीकरण केंद्र दुरुस्तीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन निधी उपलब्धतेनुसार कामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील लोककलावंतांना अनुदान मिळण्याबाबत**

**(१२) * ६६२८४ श्री.संजय पोतनीस (कलिना), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कलावंतांना ऑनलाईन मानधन देण्याची सुविधा उपलब्ध करुन दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांस्कृतिक संचालनालयाकडे अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे २१,५२६ कलावंतांना ऑनलाईन मानधनापासून वंचित राहावे लागले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच लोककला अनुदान शिफारस समितीच्या माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या बैठकीत मंजूर झालेले अनुदान तमाशाच्या ७ पथकांना व संगितबारीच्या १५ पथकांना अद्यापही देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच बुलडाणा जिल्हयात समिती गठीत नसल्याच्या कारणास्तव सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या दोन वर्षापासून वृध्द लोक कलावंत मानधनापासून वंचित असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार आवश्यक ती कर्मचाऱ्यांची भरती करून वंचित असलेल्या कलावंतांना प्रलंबित मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

वृध्द साहित्यिक व वृध्द कलावंत मानधन योजनेअंतर्गत राज्यात एकूण २७,१५० लाभार्थी असून १७,३६८ इतक्या लाभार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यावर मानधनाची रक्कम ऑनलाईनव्दारे जमा करण्यात येत आहे.

उर्वरित ९,७८२ लाभार्थ्यांचे बँक खाते व आयएफएससी कोड उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही सुरु असून सदर माहिती प्राप्त होताच त्यांच्या बँक खात्यावर मानधनाची रक्कम ऑनलाईनव्दारे जमा करण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील ७ तमाशा पथकांना व १६ संगितबारीच्या पथकांना प्रयोग अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे.

(४) हे खरे आहे.

तथापि, बुलडाणा जिल्ह्यातील समिती गठीत करण्याबाबत संबंधितांना यापूर्वीच सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच नियमित पात्र लाभार्थ्यांना मानधन अदा करण्यात येत आहे.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील “केसी फार्मा” या प्रतिबंधित औषधांचा अनधिकृत साठा करणा-या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * ६५२८२ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती**

**मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील "केसी फार्मा" या औषध निर्मीती कंपनीवर आणि मुंबई व गुजरातच्या औषध निर्मिती कंपन्यांवर केंद्रीय अंमली पदार्थ विरोधी शाखेने छापे टाकून प्रतिबंधित औषधाचा साठा जप्त केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औषंधाचा साठा करुन तो अमेरिका, लंडन व ऑस्ट्रेलिया मधील अंमली पदार्थ तयार करणा-या आणि विकणा-या टोळयांना दिला जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एफडीएकडून जास्तीचा साठा ठेवण्यास परवानगी देण्यात येत नसूनही केसी व डॉल्फीन कंपन्यांनी औषधांचा साठा केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कारखान्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) दि. १७/०८/२०१६ च्या टाईम्स ऑफ इंडिया व लोकमत या वृत्तपत्रात मुंबई व गुजरातच्या औषध निर्मिती कारखान्यांवर केंद्रीय अंमली पदार्थ विरोधी शाखेने छापे टाकून प्रतिबंधित औषधांचा साठा जप्त केल्याच्या बातम्या प्रकाशित झाल्या होत्या. त्यात नमूद केल्यानुसार केंद्रीय अंमली पदार्थ विरोधी शाखेने गुजरातमधील डॉल्फिन व मुंबईमधील के.सी. फार्मा या पेढीवर छापे टाकून सायकोट्राफिक या औषधाचा साठा जप्त केल्याचे नमूद करण्यात आले होते.

(२) सदर कारवाई केंद्रीय अंमली पदार्थ विरोधी शाखेने केली आहे. वृत्तपत्रातील बातमीच्या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाव्दारे क्षेत्रीय संचालक, केंद्रीय अंमली पदार्थ विरोधी शाखा, मुंबई यांना सदर घटनेची तपशीलवार माहिती देण्याबाबत दि. ०१/०९/२०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. ती माहिती अद्याप अप्राप्त आहे.

(३) सदर बातमीच्या अनुषंगाने प्रशासनाव्दारे दि. १७/०८/२०१६ रोजी मे. के.सी.फार्मा, अंधेरी, मुंबई या पेढीची तपासणी करण्यात आली. तपासणीच्यावेळी पेढीच्या जागेमध्ये कोणताही विक्रीयोग्य औषधांचा साठा आढळून आला नाही. डॉल्फिन कंपनी गुजरात राज्यात स्थित असल्याने त्यांच्याकडील औषधांचा साठ्याची माहिती उपलब्ध नाही.

(४) अन्न व औषध प्रशासनाद्वारे दि. १७/०८/२०१६ रोजी मे. के.सी.फार्मा, अंधेरी, मुंबई या पेढीची तपासणी करण्यात आली.तपासणीच्या वेळी पेढीत आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने प्रशासनाच्या दि. ०७/१०/२०१६ अन्वये सदर पेढीचे परवाने दि. १७/१०/२०१६ पासून रद्द करण्यात आले आहेत. डॉल्फिन कंपनी गुजरात राज्यात स्थित असल्याने या कंपनीवर राज्याच्या अन्न व औषध प्रशासनामार्फत कारवाई अपेक्षित नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हयात टँकरव्दारे करण्यात आलेल्या पाणी पुरवठ्यात झालेला गैरव्यवहार

**(१४) * ६६३७९ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्हयात दुष्काळग्रस्त पाणी टंचाई निवारणासाठी सन २०१५-१६ मध्ये टँकरद्वारे करण्यात आलेल्या पाणी पुरवठयामध्ये गैरव्यवहार झाल्या प्रकरणीचा चौकशी अहवाल कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा योजना, अहमदनगर यांनी अभिप्रायासह सादर करावा असे निदेश स्थायी समितीच्या बैठकीत अध्यक्ष, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी दिल्याची माहिती दिनांक १५ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय हे खरे आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्या दि.२३.०९.२०१६ च्या आदेशान्वये प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्याच्या दृष्टीने एका गटविकास अधिका-यास दुस-या पंचायत समितीची चौकशी करण्याबाबत आदेश दिले आहेत. सदर चौकशीचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**शेगाव (जि. बुलढाणा) येथील गोदामामधून काळया बाजारातील धान्य जप्त केल्याबाबत**

**(१५) * ६८०९२ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव (जि.बुलढाणा) येथील नवोदय विद्यालयाजवळील सर्वोदय औद्योगिक वसाहत येथील गजानन ॲग्रो इंडस्ट्रीज समोरच्या टिनपत्र्याचे शेड व मारोती दालमिल प्लॉट ८ व ९ नंबरच्या गोदामामध्ये स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकून रेशनचा काळया बाजारातील तांदळाचा १३३ क्विंटलचा साठा व एक टाटा एस वाहन असा एकूण ४ लाख ३० हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने साठेबाजी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात धान्याचा काळा बाजार करणारे आरोपी १) श्री.शेख असलम शेख इस्माईल २) श्री.पंकज किसनगोपाल शर्मा ३) श्री.मनोज सत्यनारायण खंडेलवाल यांच्या ताब्यातील सार्वजनिक वितरण प्रणालीमधील रेशनाचा १३३ क्विंटल तांदूळ, वाहन व इतर साहित्य असा एकूण रु.४,३०,५३०/- रुपयांचा मुद्देमाल

मिळाल्याने त्यांचेविरुध्द जिवनावश्यक वस्तु अधिनियम,१९५५ कलम ३ व ७ अन्वये पोलीस स्टेशन, शेगाव शहर येथे अप क्र.३१८/१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरण मा.न्यायालयाच्या अंतिम निर्णयासाठी न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गोरेगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील शासकीय गोदामातून धान्याचा झालेला गैरव्यवहार**

**(१६) * ६५६३४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोरेगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील शासकीय गोदामातून माहे जून ते जुलै २०१६ या दरम्यान जिल्हा पूरवठा अधिकारी व तहसिलदार गोरेगाव यांनी पाहणी केली असता रूपये ४५ लाख एवढया किंमतीच्या शिधावाटप धान्याचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार पुरवठा अधिकारी व इतर अधिकारी यांच्या संगनमताने व तत्कालीन गोदाम किपर श्री. गुलाम सरवर खान यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) गोरेगाव (जि.गोंदिया) तालुक्यातील शासकीय गोदामातून शिधावाटप धान्याचा अपहार झाल्याचे सन-२०१६ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) सद्यस्थितीत सदर गैरव्यवहार तत्कालीन गोदामपाल श्री. गुलाम सरवर खान यांनी केल्याचे निष्पन्न झाले असून त्यांना याप्रकरणी निलंबित करण्यात आले आहे. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, गोरेगाव येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

-----------------

## लोहारा (जि.अकोला) गावात जिल्हा अन्न पुरवठा अधिकारी, अकोला यांनी जप्त केलेला शिधावाटपाचा तांदूळ

**(१७) * ७०२२८ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोहारा (जि.अकोला) गावात जिल्हा अन्न पुरवठा अधिकारी, अकोला यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास छापा टाकून लाखो रुपयांचा शिधावाटपाचा तांदूळ जप्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील चोहोट्टा बाजार येथे दिनांक १८ ऑक्टोबर,२०१६ रोजी वा त्यासुमारास वाहन क्र. एम.एच.३० एव्ही.४३ द्वारे शिधावाटपाचा तांदूळ पकडला गेला तसेच जिल्ह्यामध्ये शासकीय धान्याचा काळ्याबाजाराची अनेक प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. तथापि, मौजे लोहारा (जि.अकोला) येथील सापडलेला तांदुळ रेशनाचा आहे किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. परंतु निरिक्षण अधिकारी, बाळापूर यांच्या तक्रारीवरुन गोदाम मालक श्री.सुशिलसिंह अनिरुध्दसिंह सिंगेल यांच्याविरुध्द जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३, ७ नुसार पोलिस स्टेशन उरळ येथे गुन्हा क्र.२१२/२०१६, दिनांक २७.१०.२०१६ नोंदविण्यात आला आहे.

तसेच मौजे चौहट्टा, ता.अकोट, जिल्हा आकोला येथील जप्त केलेला तांदुळ सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप करावयाचा आहे किंवा कसे हे स्पष्ट होत नाही. निरिक्षण अधिकारी यांनी सदर तांदुळाचे नमुने रासायनिक प्रयोगशाळेकडे पाठविले आहेत. निरिक्षण अधिकारी यांनी चौकशी करुन सदर वाहनामध्ये असलेल्या ४८ कट्टे तांदुळ हा रेशनचा असल्याचा संशय असल्याने आरोपी श्री.गणेश सुरजमल अग्रवाल यांच्याकडून जप्त करण्यात आला आहे. तसेच गैरअर्जदार श्री.गणेश अग्रवाल यांनी दिलेले बील बनावट असल्याचे दिसून आल्याने त्यांच्याविरुध्द जिवनावश्यक वस्तु अधिनियम १९५५ चे कलम ३,७

नुसार पोलिस स्टेशन अकोट येथे गुन्हा क्र.४४६/२०१६, दिनांक २४.११.२०१६ नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये**
**वैधमापन यंत्रणेने केलेली तपासणी**

**(१८) * ६५३१४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांना वैधमापन शास्त्र अधिनियम २००९, वैधमापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम २०११ व वैधमापन शास्त्र (आवेष्टित वस्तू) नियम २०११ हे नियम लागू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील विविध कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये, शेत मालाची खरेदी करताना चुकीची वजने, वजनात बनावटपणा करणे इत्यादी माध्यमांतून शेतकऱ्यांच्या मालाची फसवणूक होत असल्याच्या तक्रारी माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान वैधमापन शास्त्र यंत्रणेकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने राज्यातील १७७ कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये वैध मापन यंत्रणेकडून तपासणी मोहिम राबविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त समित्यांची वैधमापन शास्त्र यंत्रणेने तपासणी मोहीम राबविताना २८४ व्यापाऱ्यांवर वैधमापन शास्त्र अधिनियम २००९ (अंमलबजावणी) २०११ (आवेष्टित वस्तु) अंतर्गत शेतकऱ्यांची फसवणूक केल्याबाबत गुन्हा दाखल केल्याचे दिनांक १६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त तपासणी मोहिमेमध्ये काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने दोषी व्यापाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय.

(३), (४) व (५) कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील वजने व तोलन उपकरणांची विशेष तपासणी मोहिम दिनांक २१ व २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वैधमापन शास्त्र यंत्रणेकडून राबविण्यात आली असून सदर तपासणी मोहिमेत १७७ कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील व्यापाऱ्यांवर विहित मुदतीत पडताळणी व मुद्रांकन करुन न घेतल्याबाबत २४१ व इतर अन्य उल्लंघनाबाबत ४३ अशी एकूण २८४ प्रकरणे नोंदविण्यात आली असून त्यांचे विरुध्द वैधमापन शास्त्र अधिनियम, २००९ व त्याअंतर्गत करण्यात आलेल्या नियमातील तरतुदीनुसार कारवाई सुरु आहे.

-----------------

## सलगरा (बु.) (ता.जि.लातूर) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून झालेली विषबाधा

**(१९) * ६७२३८ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सलगरा (बु.) (ता.जि.लातूर) येथील जिल्हापरिषदेच्या शाळेतील ८० विद्यार्थ्यांना दिलेल्या मध्यान्ह भोजनातून दिनांक १४ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) दिनांक १४/१०/२०१६ रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सलगरा (बु), ता.जि.लातूर या शाळेतील १८२ विद्यार्थ्यांपैकी १११ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहाराचे वाटप झालेनंतर आहारात पाल असल्याचे निदर्शनास आले होते. यामुळे आहाराचे वाटप तात्काळ थांबविण्यात आले. यानंतर ५ विद्यार्थ्यांना उलटी व मळमळचा त्रास झाला. मुलांना त्रास सुरु झालेनंतर शालेय पोषण आहार घेतलेल्या सर्व १११ विद्यार्थ्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

(२) सदर प्रकरणी पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून, स्वयंपाकी तथा मदतनीस यांना कामावरुन कमी करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## राज्यातील आदर्श शिक्षक पुरस्काराबाबत

**(२०) * ६५५७२ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदर्श शिक्षक पुरस्कारामध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे तसेच नव्या निकषांबाबत जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांमध्ये अस्पष्टता असल्याने अनेक शिक्षक व शिक्षक संघटनांनी नाराजी व्यक्त केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदशर्नास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दरवर्षी प्रत्येक जिल्हयातील एका शिक्षकाची पुरस्कारासाठी निवड केली जात असून यावर्षी १०९ शिक्षकांची शासनातर्फे घोषणा करण्यात आली मात्र चंद्रपूर जिल्हयाचा अपवाद वगळता विदर्भातील १० जिल्हयातील शिक्षकांना आदर्श राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारापासून वंचित ठेवण्यात आले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुसार आदर्श शिक्षक पुरस्कारामध्ये अन्याय झालेल्या शिक्षकांना न्याय देऊन तसेच विदर्भातील शिक्षक या पुरस्कारापासून वंचित राहणार नाहीत याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे मणेरी (जि.सातारा) गावामधील राष्ट्रीय पेयजल योजनेतंर्गत करण्यात आलेल्या कामाच्या चौकशीबाबत

**(२१) * ६६२४१ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण मतदारसंघात मौजे मणेरी (जि.सातारा) गावाकरीता राष्ट्रीय पेयजल योजनेतंर्गत पिण्याच्या पाण्याची योजना कार्यान्वीत करणेकरीता शासनामार्फत निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या योजनेकरीता शासनाने सुमारे ४८ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून सदरची योजना ही केवळ एका वार्डासाठीच कार्यान्वीत करणेत आली असून गांवातील ७५ टक्के लोकवस्तीला ही योजना कार्यान्वीत केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजनेच्या देयकाच्या धनादेशावर उक्त ठिकाणचे उपसरपंच यांनी सरपंचाच्या खोट्या सह्या करुन तसेच ग्रामपंचायतीच्या कागदपत्रांचा दुरुपयोग करुन बोगस व्यक्तीची नावे दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा व गटअधिकारी, पंचायत समिती, पाटण यांचेकडे मणेरी ग्रामस्थांनी या सर्व प्रकाराची तसेच ग्रामपंचायती अंतर्गत करण्यात आलेल्या सर्व विकास कामांची उच्चस्तरीय चौकशी करुन दोषींवर कडक कारवाई करणेसंदर्भात लेखी तक्रारीही केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

(२) होय.

(३) नाही.

मणेरी गावचे सरपंच यांनी राजीनामा दिल्याने ग्रामपंचायतीच्या दि. १०.५.२०१३ रोजीच्या सभेत उपसरपंच यांच्याकडे सरपंच पदाचा कार्यभार सोपविण्यात आला.

(४) होय.

मौजे.मणेरी ता.पाटण या गावातील ४९ ग्रामस्थांनी मणेरी ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत दि.०१/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये गटविकास अधिकारी पाटण यांच्या कडे चौकशीची मागणी केली आहे.

(५) गटविकास अधिकारी, पाटण, जि. सातारा यांनी तक्रारीतील सर्व मुद्दयांची चौकशी केली असुन सदर प्रकरणी सकृत दर्शनी कोणताही दोष आढळुन न आल्याने कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शालेय पोषण आहार योजनेंतर्गत स्टेनलेस स्टीलची ताटे दुय्यम दर्जाची खरेदी केल्याबाबत

**(२२) * ६५३४७ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पुरविण्यात येणारा शिजवलेला पोषण आहार देण्यासाठी माहे फेब्रुवारी ते ऑगस्ट, २०१६ या कालावधीत ५३ कोटी ४९ लाख रुपयांची १२ कंत्राटदारांकडून खरेदी करण्यात आलेली ताटे निकृष्ट दर्जाची व मानकांनुसार खरेदी केली नसल्याचे शासकीय औद्योगिक प्रशिक्षक संस्था व भारतीय मानक विभाग यांनी केलेल्या तपासणीत आढळल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शालेय शिक्षण विभागाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय पोषण प्राधिकरणाने मुलांना शिजवलेले अन्न देण्यासाठी वापरण्यात येणारी ताटे ०.७ मी.मी., स्टील पट्टयांची ०.५५ मी.मी. जाडी व्यास असे परिमाण विभागाला ठरवून दिले असतानाही सदर ताटे प्राधिकरणाने शासकिय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) यांच्याकडून तपासून घेतल्यानंतर ०.३० मी.मी. ते ०.५० मी.मी. व्यासाची तसेच परिमाणांशी सुसंगत नसल्याचे आढळून आले असून एकाही ताटावर उत्पादकाचे अद्याक्षर किंवा चिन्ह

तसेच एमएस शेरा नसल्याबाबतच्या अनेक त्रुटी शासनाला कळविल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय व त्यानुसार ठरवून दिलेल्या मानकांनुसार ताटे न पुरविणाऱ्या १२ कंत्राटदाराविरुध्द तसेच कंत्राटदाराला अदा केलेली ५३ कोटी ४९ लाख रुपयांची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) महालेखापाल यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या संपादणूक लेखापरिक्षण अहवालामध्ये अशा स्वरुपाचा लेखाआक्षेप नमूद करण्यात आला आहे.

(३) व (४) केंद्र शासनाच्या डायरेक्टर जनरल ऑफ सप्लाय अॅड डिस्पोजल (डी.जी.एस.अॅड डी.) दरकरारानुसार सदर ताटांचा पुरवठा करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या दरकरारातील नमूद परिमाणानुसार राज्य् शासनाच्या मान्यताप्राप्त संस्थेकडून ताटांची पुरवठापूर्व व पुरवठापश्चात तपासणी केली असता अनुकूल तपासणी अहवाल प्राप्त झाले होते. महालेखापाल यांच्या अहवालाबाबत विभागाचे अभिप्राय महालेखापाल कार्यालयास सादर करण्यात येत आहेत.

-----------------

## गावतळे (ता.दापोली, जि. रत्नागिरी) परिसरातील प्रस्तावित तेल शुद्धीकरण प्रकल्पाला होत असलेला विरोध

**(२३) * ७०८१४ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गावतळे (ता.दापोली, जि. रत्नागिरी) परिसरातील प्रस्तावित तेल शुद्धीकरण प्रकल्पाविरोधात गावतळे, शिवनारी, टेटवली, शेरवली, शिवाजीनगर इ. परिसरातील गावातील ग्रामस्थांनी माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान तहसिल व उपविभागीय अधिकारी यांना निवेदनाद्वारे सदरचा प्रकल्प उभारू नये अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रासायनिक प्रकल्पामुळे दापोली तालुक्याच्या पर्यावरणाला हानी पोहचत असून येथील शेतीवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरातील ग्रामस्थांचा तीव्र विरोध लक्षात घेता उक्त प्रकल्प मागे घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) शिवनारी ग्रामस्थ मंडळामार्फत तहसिलदार, दापोली यांना माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये अशा आशयाचे निवेदन देण्यात आले आहे.
(२) व (३) राज्यातील प्रस्तावित असलेल्या मेगा रिफायनरी ऑईल प्रकल्पासाठी स्थळनिश्चिती (जागा) करण्यासंबंधीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोल्हारे (ता. कर्जत, जि. रायगड) ग्रामपंचायतीने उल्हासनदीच्या काठावर कचरा डेपो सुरु केल्याने होणारे जलप्रदूषण**

**(२४) * ६९९०३ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायतीने उल्हासनदीच्या पात्रापासून जेमतेम २० मीटर अतंराच्या काठावर कचरा डेपो सुरू केल्याने डेपोतून जाणाऱ्या सांडपाण्यामुळे नदी प्रदूषित झाल्याने कोल्हारे, धामोते आणि बोपेले या गावातील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची गैरसोय झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कचरा डेपो नदीकाठी सुरू करण्यास प्रदुषण व नियंत्रण मंडळाने परवानगी दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुषंगाने संबंधितांवर कारवाई करण्याबाबत तसेच नागरिकांना शुध्द पाणी पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) कोल्हारे ग्रुप ग्रामपंचायतीने उल्हासनदीच्या पात्रालगत सुमारे ५०० मी अंतरावर ग्रुप ग्रामपंचायत हद्दीमधील नागरी घनकचऱ्याची विल्हेवाट करणे सुरू केले आहे ही बाब खरी आहे. कोल्हारे, धोमेते आणि बोपेले गावातील नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय झाल्याबाबतची कोणतेही तक्रार पंचायत समिती, कर्जत यांच्याकेडे प्राप्त झालेली नाही.

(२) हे, खरे आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून दि. २६/१०/२०१६ च्या पत्रान्वये जिल्हा परिषद रायगड यांना ग्रामपंचायतीकडून नागरी घनकचऱ्याचे व्यवस्थापन शास्त्रोक्त पद्धतीने करणेकामी कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील डम्पिंग ग्राउंडवर ई कचरा जाळत असल्याने होणारे प्रदूषण**

**(२५) * ६९६९१ श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इलेक्ट्रॉनिक कचरा देशाच्या तुलनेत अधिकतम निर्माण होत असतांना नऊ प्रमुख शहरामध्ये मुंबईचा अग्रकम लागत असून बहुतांश ई कचरा डम्पिंग ग्राउंडवरच टाकला जात असल्याने यामधील तांब्याची तार मिळविण्यासाठी भंगारवाले ई कचरा जाळत असल्याने यामधुन निघणारे विषारी घटक हवेत पसरून नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याचे दिनांक १७ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

दिनांक १७ ऑक्टोबर २०१६ रोजी वा त्या सुमारास अशा प्रकारची घटना निदर्शनास आल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**पुण्यासह राज्यभरात शिक्षण अधिकाऱ्यांकडून अनियमितपणे वैयक्तिक मान्यता घेऊन शिक्षकांना सेवेत सामावून घेतले जात असल्याबाबत**

**(२६) * ७१४४९ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षक भरतीवर शासनाने दिनांक २ मे, २०१२ नंतर बंदी घातली असतांना पुण्यासह राज्यभरात शिक्षण अधिकाऱ्यांकडून अनियमितपणे वैयक्तिक मान्यता घेऊन शिक्षकांना सेवेत सामावून घेतले जात असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्यातील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी नव्याने मागील तारखेच्या शिक्षकांची वैयक्तिक मान्यता देऊन वेतन पथक कार्यालयातून वेतन अदा करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील खासगी विनाअनुदानित, अनुदानित, सरकारी, महानगरपालीका, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षकांची वैयक्तिक मान्यता नियमबाहय पध्दतीने देण्यात आली असून यात ३५ हजार वैयक्तिक मान्यता संशयास्पद असल्याचा प्रकार अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनासाठी तयार केलेल्या सेवाजेष्ठता याद्यांमधून दिनांक ३ नोव्हेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शिक्षक भरतीमध्ये मोठ्याप्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास येत असल्याने शासनाने उक्त प्रकरणासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

वेतनाच्या शालार्थ प्रणालीवरुन घेतलेल्या माहितीत दि.२ मे, २०१२ नंतर नियुक्त्या दिल्याचे प्रथमदर्शनी आढळून येत आहे. तथापि त्या वैयक्तिक मान्यतांमध्ये शासन मान्यतेने दिलेल्या गणित, इंग्रजी व विज्ञान विषयाच्या पदांचाही समावेश आहे. अनियमित करण्यात आलेल्या नियुक्तीबाबत आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

**राज्यातील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या गैरकारभाराबाबत**

**(२७) * ६५४८९ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गरीब, मध्यमवर्गीय आणि नोकरी करून शिकणाऱ्या विद्यार्थांचा शिक्षणासाठी आधार असलेल्या यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाने सर्व नोंदणी शुल्क एकाच वेळी भरण्याचे आदेश दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यशवंतराव चव्हाण विद्यापीठाचे हॉटेल व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी शुल्क हे २२ हजार असून या शुल्कासह ४० हजार रुपये भरण्याचे आदेश दिल्याने नियमित विद्यापिठांमध्ये शिकणे कठीण असलेल्या व स्वकमाईतून शिक्षण घेत असलेल्या आणि बिकट आर्थिक परिस्थिती असलेल्या विद्यार्थ्यांना एकरकमी शुल्क भरणे हे जाचक असल्याने विद्यार्थ्यांमध्ये असतोंष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, देशातील कोणत्याही मुक्त विद्यापिठांपेक्षा आणि पारंपारिक विद्यापिठांपेक्षा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठांचे नोंदणी शुल्क अनेक पटीने जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठांचे नोंदणी शुल्क कमी करणे व एकरकमी शुल्क भरण्याची अट रद्द करण्यासंबंधी तसेच गरीब व मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना कमी शुल्कात दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) होय.
(२) यासंदर्भात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडे काही निवेदने प्राप्त झाली आहेत
(३) नाही.
(४) व (५) या अभ्यासक्रम शुल्क कमी करण्याचा विषय विद्यापीठाच्या वित्त समिती व व्यवस्थापन मंडळासमोर निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहे.

-----------------

**वडाळा महादेव (ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) येथील पाणी योजनेवरील तलावाचे खोलीकरण कामात झालेला गैरव्यवहार**

**(२८) * ७११०३ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडाळा महादेव (ता.श्रीरामपुर,जि.अहमदनगर) येथील पाणी योजनेवरील तलावाचे खोलीकरण अशोक कारखाना व ग्राम पंचायतीने केलेले असतांना जिल्हा परिषदेने हेच काम पुन्हा मे. कॉसमॉस इन्फ्राटेक कंपनी, मीरा रोड, मुंबई या ठेकेदाराला देऊन राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत दोन कोटी रुपये मंजूर केल्याची माहिती दिनांक १७ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीने संबंधित तलाव खोदल्याचे दाखवून लाखो रुपये घेतल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सदर प्रकरणाबाबत जिल्हा परिषदेने चौकशी केली आहे. त्यात तथ्य आढळून आले नाही. त्यामुळे संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई (जि.पालघर) येथील ६९ गावांसाठी असलेली**
**पाणी पुरवठा योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(२९) * ६७५८१ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) मधील वाघोली, नवाळे, मर्देस, निर्मळ रानगाव, अर्नाळा, नाळे, राजोडी, कामण, देवदळ, बापाणे, ससूनवघर आदी ६९ गावांसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाअंतर्गत असलेल्या पाणी पुरवठा योजनांचे काम सन २०१० मध्ये पूर्ण होणे अपेक्षित असताना व तीन वेळा मुदतवाढ देवून १०० कोटी रूपये खर्च करूनही अद्यापपर्यन्त सदरहू योजना अपूर्णावस्थेत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना पूर्ण करण्यास दिरंगाई झाली असल्याकारणाने याप्रकरणी सखोल चौकशी करून संबंधित दोषीविरोधात कारवाई तसेच योजना लवकरात लवकर कार्यान्वित करावी अशा आशयाच्या मागणीचे एक निवेदन माजी नगरसेवक राजकुमार चोरघे यांनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मा.पालकमंत्री, पालघर जिल्हा आदीकडे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान व गत ३ वर्षापासून सातत्याने सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच संबंधित दोषीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

योजनेच्या कामास तीन वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर योजनेची मूळ प्रशासकीय मंजूर किंमत रुपये ८५.१६ कोटी होती. तथापि, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विनंतीस अनुसरुन सदर योजनेच्या मूळ मंजूर किंमतीच्या १० % जास्त खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात आली. त्यानुसार योजनेची किंमत ९३.६८ कोटी झाली आहे. या योजनेवर अद्यापपर्यंत रुपये ९०.११ कोटी खर्च झालेला असून योजनेचे काम ९८ % पूर्ण झालेले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) योजनेतील ६९ गावांना वसई विरार शहर महानगर पालिकेच्या अस्तित्वातील योजनेतून विविध ठिकाणी नळ जोडणीद्वारे पाणी पुरवठा करणे प्रस्तावित आहे. सद्य:स्थितीत ६९ गावांपैकी ५२ गांवे ही वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत समाविष्ट झालेली आहेत. त्यापैकी सातीवली, नागळे बीलालपाडा, गोक्षिवरे, जुचंद्र, चंदनसार, शिरगांव, मांडवी, चिखलडोंगरी व बोळींज या १० गावांना महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा सुरु आहे.

उर्वरित गावांना वसई विरार शहर महानगरपालिकेस ९२.०० द.ल.लि. पाण्याचा तुटवडा असल्याने मनपाची प्रगतीपथावर असलेली नगरोत्थान अभियानाअंतर्गत वाढीव १०० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना (सुर्या उद्धव टप्पा-३) पूर्ण झाल्यावर वसई विरार शहर महानगरपालिका पाणी उपलब्ध करुन देणार आहे. वन खात्याच्या परवानगीमुळे यास विलंब लागला आहे. याबाबत वसई विरार शहर महानगरपालिकेकडे पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अंधेरी (मुंबई) येथील डॉक्टर जोशीज मॅटर्नीटी अँण्ड सर्जिकल रुग्णालयामध्ये विनापरवाना औषधांची विक्री करणाऱ्या डॉक्टराला पकडल्याबाबत**

**(३०) * ६८३२९ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी (मुंबई) येथील डॉक्टर जोशीज मॅटर्नीटी अँण्ड सर्जिकल रुग्णालयामध्ये विनापरवाना औषधांची विक्री करणाऱ्या एका डॉक्टराला अन्न व औषध प्रशासनाने (एफडी) दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास पकडून रूपये ३ लाखांची औषधे जप्त केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी दिनांक ६ ऑगस्ट, २०१६ रोजी डॉक्टर जोशीज मॅटर्नीटी अँण्ड सर्जिकल हॉस्पीटल, पार्वती बिल्डींग, एस.व्ही.रोड, अंधेरी (प), मुंबई या रूग्णालयामध्ये छापा टाकला असता, तेथे विनापरवाना औषधांची विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्याने सुमारे ३ लाखांचा औषधी साठा जप्त करण्यात आला.

(२) व (३) प्रशासनाव्दारे करण्यात आलेल्या चौकशीत सदर रूग्णालयामध्ये विनापरवाना औषधांची खरेदी, साठवणूक व विक्री होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे याप्रकरणी संबंधित चार व्यक्तींविरोधात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० अन्वये महानगर दंडाधिकारी, १५ वे माझगाव कोर्ट, शिवडी, मुंबई यांचे न्यायालयात दि. १७/११/२०१६ रोजी खटला क्र. १५००१९२/ SW/२०१६ दाखल केला असून. सदर खटला सुनावणीसाठी न्यायालयात प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पातळगंगा औद्योगिक परिसरातील मे. कॅनबेरी लि. आणि तारापुरमधील दि फार्मस्यिुटीकल प्रॉडक्टस ऑफ इंडिया या कंपन्यांवर टाकण्यात आलेले छापे

**(३१) * ६९११४ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पातळगंगा औद्योगिक परिसरातील मे. कॅनबेरी लि. आणि तारापुरमधील दि फार्मस्यिुटीकल प्रॉडक्टस ऑफ इंडिया या दोन्ही कंपन्यानी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा कलम १८ (क) व ११८ (अ) नुसार बनावट औषधे तयार करून निर्यात केले व एफडीएच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे तसेच मेटफॉर्मिन हायड्रोक्लोराईड या औषधाची बेकायदेशीर निर्मिती व औषधांचा साठा करून सदर औषधाचे उत्पादन व विक्री सरकारी परवान्याविना करीत असल्याचे माहे ९ ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन कंपन्यांवर एफडीएच्या गुप्तचर विभागाने छापा टाकून ४५ ते ५० लाख रुपयांचा औषधांचा साठा जप्त केल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेटफॉर्मिन हायड्रोक्लोराईड या मधुमेहासाठी उपयुक्त असणाऱ्या बनावट प्रतिच्या औषधांमुळे अनेक रूग्णांना आपला जीव गमवावा लागला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर दोन्ही कंपन्यांमध्ये बेकायदेशीरपणे अन्य कोणत्या औषधांचे उत्पादन व साठा करण्यात आला होता याबाबतचा तपास पूर्ण झाला आहे काय व दोन्ही कंपन्या सील करण्यात आल्या आहेत काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाच्या गुप्तवार्ता विभागाच्या पथकाव्दारे दि. ०३/०९/२०१६ रोजी मे. दि. फार्मास्युटीकल्स प्रॉडक्टस ऑफ इंडिया, एम.आय.डी.सी, तारापुर, बोईसर व मे. बॅनबेरी लिमिटेड, पाताळगंगा,

एम.आय.डी.सी, जि. रायगड या दोन्ही पेढ्यांची तपासणी करण्यात आली. या दोन्ही पेढ्यांना मेटफॉर्मिन हायड्रोक्लोराईड या मुलभूत औषधी द्रव्याचे उत्पादन करण्याची अनुमती आहे. तपासणीच्यावेळी मे. बॅनबेरी लि. या पेढीस मेटफॉर्मिन हायड्रोक्लोराईड या मुलभूत औषधी द्रव्याचे उत्पादन करण्याची अनुमती दि. ०४/०८/२०१६ रोजी मंजूर असुन पेढीने त्यापूर्वीच मेटफॉर्मिन हायड्रोक्लोराईड चे माहे जुलै २०१६ मध्ये उत्पादन करून त्याचे वितरण केल्याचे निदर्शनास आले.

(२) तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या आधारे मे. बॅनबेरी लि. या पेढीने पेढीस मंजूर उत्पादन दिनांकाआधीच उत्पादित केलेला मेटफॉर्मिन हायड्रोक्लोराईड या मुलभूत औषधी द्रव्याच्या ११ बॅचेसचा एकूण अंदाजे २२ टन साठा किंमत रूपये ४४ लाख जप्त न करता प्रतिबंधित करण्यात आला.

(३) अशा प्रकाराची बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(४) या दोन्ही कंपन्यामध्ये इतर कोणत्याही औषधांचे बेकायदेशीररीत्या उत्पादन करण्यात येत असल्याचे तपासणीच्या वेळी प्रशासनाच्या निदर्शनास आलेले नाही. कोणतीही कंपनी सील करण्यात आलेली नाही.

(५) या प्रकरणी तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेल्या त्रुटी व अनियमिततेबाबत दि. २५/१०/२०१६ रोजी पेढ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. पेढ्यांचे उत्तर प्रतिक्षाधीन आहे.स्पष्टीकरण प्राप्त झाल्यावर त्यांना वैयक्तिक सुनावणीची संधी देऊन नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौ. धामणगाव (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील केव्हीन केअर प्रा. कंपनीत करण्यात आलेला अवैध धान्यसाठा

**(३२) * ६७६९७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो. धामणगाव (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील केव्हीन केयर प्रा.लि. या कंपनीच्या नावाने गोदामात ठेवलेला ९३ लाख रूपयांचा अवैध धान्यसाठा पुरवठा निरीक्षण अधिकारी व्ही.बी.पवार, बी. आर पाटील, तलाठी सजा वडपे तसेच

तालुका पोलीस ठाण्याच्या पोलीसांसह घातलेल्या छाप्यामध्ये धान्य, पामतेल, कडधान्य, साखर, गूळ इ.जीवनावश्यक वस्तूंचा साठा केल्याचे दिनांक १४ ऑगस्ट २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीत जीवनावश्यक वस्तूंचा विनापरवानगी साठा करुन ठेवल्याबाबत कंपनी मालक टी.डी.मोहन व संचालक मुथुवल्ली अप्पन यांच्याविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा १९५५ चे कलम ३ व ७ प्रमाणे गुन्हा दाखल केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनीचे व्यवस्थापक यांच्याकडे तपासणी केले असता अन्न व नागरी पुरवठा विभागाचा आवश्यक तो घाऊक आणि किरकोळ साठ्याचा परवाना उपलब्ध नसून कंपनीत आवक-जावक, शिल्लक असे कोणतेही रजिस्टर कंपनीकडे उपलब्ध नव्हते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार संबंधितांवर तसेच कंपनी मालक व संचालकाविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे आहे.

मौजे धामणगांव, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील केविन केअर प्रा.लि. या कंपनीची दिनांक १२.०८.२०१६ रोजी तपासणी अधिकाऱ्यांनी तपासणी केली. सदर तपासणीमध्ये कंपनीने एकूण ९३,६१,३८८/- रुपये किंमतीचा तेल, तेलबिया, डाळी, गुळ, साखर या जीवनावश्यक वस्तूंचा विनापरवाना साठा केल्याचे दिसून आले.

त्यास अनुसरुन दि.१३.०८.२०१६ रोजी केविन केअर प्रा.लि. या कंपनीविरुद्ध जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ च्या कलम ३ व ७ अंतर्गत भिवंडी पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(३) व (४) हे खरे आहे.

तपासणी दरम्यान सदर कंपनीने कोणताही परवाना घेतला नसल्याचे तसेच कंपनीकडे कोणत्याही नोंदवह्या नसल्याचे निदर्शनास आले. यास्तव, कंपनीविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ च्या कलम ३ व ७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येऊन माल जप्त करण्यात आलेला असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात डाळींचे दर नियंत्रित करण्याबाबत

**(३३) * ६६९२३ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संतोष दानवे (भोकरदन), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तूरडाळ मोठ्या प्रमाणावर बाजारात येत असताना राज्यात तुरडाळीचे किरकोळ दर कमी करण्यास व्यापारी तयार नसून चणा, उडीद व तुरडाळी अशा सर्व डाळींचे साठे करीत असून व्यापारी मनमानी पध्दतीने रूपये २२० ते २४० किलो दरवाढ करुन विकत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व नागरी पुरवठा विभागाने राज्यात डाळींच्या घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांकडील साठ्यांची तपासणी मोहीम सुरु केल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होते त्यावेळी अत्यावश्यक वस्तू कायदा कलम-३ प्रमाणे राज्य शासनाला त्या किंमती आटोक्यात ठेवण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्य शासनाचा प्रस्तावित डाळी दर नियंत्रण करण्यासाठी केलेल्या कायद्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने शासनाने विशेष मोहिम राबवून डाळीची साठेबाजी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त कायद्याचा केंद्र शासनाकडे प्रलंबित प्रस्तावास मंजुरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) हे खरे नाही.

केंद्र शासनास पाठविण्यात आलेल्या जीवनावश्यक वस्तूंच्या दैनिक दरांबाबतच्या माहितीनुसार माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये चणाडाळ कमाल रु.११७/- प्रति किलो, तूरडाळ कमाल रु.१४०/- प्रति किलो, उडीदडाळ कमाल रु.१७५/- प्रति किलो असे दर होते.

तथापि, राज्यात डाळींची विशेषत: चणाडाळीची साठेबाजी होऊन भाववाढ होऊ नये या दृष्टीकोनातून आवश्यक उपाययोजना करण्याबाबत अनुक्रमे दि.०१.०७.२०१६ चे अ.शा.पत्र तसेच दि.२३.०९.२०१६ व दि.३०.०९.२०१६ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) केंद्र शासनाच्या दि.२९.०९.२०१६ च्या अधिसूचनेस अनुसरुन, राज्य शासनाने दि.१९.१०.२०१६ च्या अधिसूचनेन्वये डाळी, खाद्यतेल व खाद्यतेल बिया या जीवनावश्यक वस्तूंवर दि.३०.०९.२०१७ पर्यंत साठा निर्बंध लागू केले आहेत.

राज्यात जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून दि.२८.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये Price Monitoring Committee गठित करण्यात आली आहे. सदर समितीच्या वेळोवेळी बैठका घेऊन, जीवनावश्यक वस्तूंचे दर नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) राज्यात डाळींचे दर नियंत्रित ठेवण्याच्या दृष्टीकोनातून डाळींसाठी दर नियंत्रक कायद्याचे प्रारुप तयार करण्यात आले आहे. सदर प्रारुपाच्या अनुषंगाने केंद्र शासनाने अतिरिक्त माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत राज्य शासनास कळविलेले आहे. सदरहू माहिती केंद्र शासनास सादर करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) राज्यात डाळींची साठेबाजी होऊन भाववाढ होऊ नये या दृष्टीकोनातून आवश्यक उपाययोजना करण्याबाबत अनुक्रमे दि.०१.०७.२०१६ चे अ.शा.पत्र तसेच दि.२३.०९.२०१६ व दि.३०.०९.२०१६ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील चणाडाळीचे दर नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने राज्य शासन खुल्या बाजारात चणाडाळीची विक्री करणार असून, केंद्र शासनाने ७०० मे.टन चणाडाळ उपलब्ध करुन दिलेली आहे व ती मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद व नाशिक येथे खुल्या बाजारात रु.७०/- प्रति किलो या दराने उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील इंग्रजी अधिव्याख्यात्याची पदे भरली नसल्याबाबत

**(३४) * ६५१०४ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयात इंग्रजी अधिव्याख्यात्याची ९२ पदे भरण्यासाठी शासनाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सन २०१४ मध्ये परिक्षा घेऊन ८७ जणांची निवड करून त्यांना तशी रितसर पत्रेही पाठविण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवड झालेल्या उमेदवारांपैकी केवळ २२ जणांना इंग्रजी अधिव्याख्याता म्हणून शासनाने सेवेत सामावून घेतले असून ६० लोकांना गत २ वर्षापासून शासकीय नोकरीत सामावून घेण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, शासकीय तंत्रनिकेतन मध्ये सध्या असलेले इंग्रजीचे अधिव्याख्याते व विद्यार्थ्यांचे प्रमाण आणि शिकविण्याचा कालावधी लक्षात घेता आजही ७९ पदे रिक्त असल्याचे सदरहू उमेदवारांनी मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्याच्या निदर्शनास वारंवार आणूनही त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने उक्त उमेदवारांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे उपोषणास बसले आहेत, हे ही खरे आहे काय
(४) असल्यास, सदरहू लोकसेवा आयोगाच्या परिक्षेत उतीर्ण झालेल्या उमेदवारांना नोकरीत सामावून घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. तथापि, काही उमेदवार दि.१० ऑक्टोबर, २०१६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे उपोषणास बसल्याची बाब खरी आहे.
(४) व (५) मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली व मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर व औरंगाबाद यांनी विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये शासकीय तंत्रनिकेतनात कंत्राटी तत्वावर दि.१५/१०/२०१३ रोजी सेवेत असणाऱ्या व या दिनांकास ज्यांची सलग ३ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा आणि अन्य विहित अटींची पूर्तता करणा-या अध्यापकांच्या सेवा नियामित करण्याबाबत आदेश दिले आहेत.

त्यानुषंगाने इंग्रजी विद्याशाखेतील ६६ कंत्राटी अध्यापकांना त्यांच्या प्रवर्गानुसार सामावून घेतल्यानंतर उर्वरित रिक्त पदांपैकी २२ उमेदवारांना प्रवर्गनिहाय गुणवत्ताक्रमानुसार सदरच्या पदांवर शासकीय तंत्रनिकेतनांमध्ये नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

-----------------

## पुणे, नागपूर-हल्दीराम फूड इंटरनॅशनल कंपनीच्या खाद्यपदार्थांच्या सीलबंद पाकिटांमध्ये कीटके आढळल्याबाबत

**(३५) * ६७३०६ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, नागपूर-हल्दीराम फूड इंटरनॅशनल कंपनीच्या खाद्यपदार्थांच्या सीलबंद पाकिटांमध्ये कीटके आढळल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न आणि सुरक्षा मानके कायदा २००६ मधील कलमानुसार ही चिक्की खाण्यास असुरक्षित असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, अखिल भारतीय ग्राहक संरक्षण समितीचे प्रदेशाध्यक्ष आणि यशदाचे माहिती अधिकार प्रशिक्षक महेंद्र दलालकर यांनी सदर प्रकार निदर्शनास आणला आहे हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर-हल्दीराम फूड इंटरनॅशनल कंपनी राज्यात मोठ्याप्रमाणात सीलबंद पाकिटांमध्ये खाद्यपदार्थ विक्री व्यवसाय करत असतांना त्यांचेवर नियंत्रण व कारवाई करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) सन २०१६ मध्ये अशी घटना प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही. मात्र सन २०१३ मध्ये अशा प्रकारची तक्रार अन्न व औषध प्रशासनास प्राप्त झाली होती.

(२) होय, सन २०१३ मधील तक्रारीसंदर्भात तक्रारदाराने स्वतः सदर चिक्कीची तपासणी राज्य आरोग्य प्रयोगशाळा पुणे यांचेकडून तपासून घेतली होती. तपासणी अहवालात सदर चिक्की खाण्यास असुरक्षित असल्याचे नमूद आहे.

(३) होय, सन २०१३ मध्ये सदर प्रकार अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आला आहे.

(४) सन २०१३ च्या सदर तक्रारीमधील चिक्की ज्या किरकोळ दुकानामधून खरेदी केली होती. त्या पेढीविरूध्द पेढीच्या तपासणीत आढळून आलेल्या त्रुटींच्या आधारे न्यायनिर्णय खटला दाखल करून पेढीला न्यायनिर्णयाच्या आधारे दि. १८/१२/२०१४ रोजी रू. ५०००/- चा दंड ठोठावण्यात आला आहे.

प्रशासनातर्फे एप्रिल २०१४ ते ऑक्टोंबर २०१६ या कालावधीत मे. हल्दीराम फूडस् इंटरनॅशनल, नागपूर या पेढीने उत्पादित केलेली एकूण ६८ नमुने नियमित तपासणीतंर्गत विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. त्यापैकी ६२ नमुने प्रमाणित ०३ नमुने कमी दर्जाचे व ०२ नमुने असुरक्षित तर १ नमुन्याचा अहवाल प्रलंबित आहे. ०३ कमी दर्जाच्या नमुन्याप्रकरणी न्यायनिर्णय खटले तर ०२ असुरक्षित नमुन्याप्रकरणी न्यायालयात खटले दाखल करण्यात आलेले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातून परराज्यात जाणारे शासकीय धान्याचे दोन ट्रक पकडल्याबाबत

**(३६) * ७०८०७ श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुरगाणा (जि.नाशिक) तालुक्यातून परराज्यात जाणारे शासकीय धान्याचे दोन ट्रक उक्त तालुक्याचे तहसिलदार यांनी दिनांक २ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पकडले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(३) असल्यास, भविष्यात असे प्रकार घडू नयेत म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) सुरगाणा (जि. नाशिक) येथील उमरठाम-सुरगणा रस्त्यावरील श्री. प्रशांत मो. पिंगळे यांच्या मालकीच्या गोदामाची तहसिलदार, सुरगणा यांनी दि. ०२ ऑक्टोबर, २०१६ रोजी तपासणी केली असता, तपासणी दरम्यान गोदामात तसेच गोदामा शेजारील दोन ट्रक मध्ये धान्याने भरलेल्या गोण्या आढळल्या आहेत, हे खरे आहे.

(२) उपरोक्त प्रकरणी तहसिलदार, सुरगाणा यांनी सखोल चौकशी केली असून चौकशी दरम्यान गोदाम मालक श्री. पिंगळे यांना धान्याचा स्त्रोत दाखविता आला नसल्याने सदरचे धान्य जप्त केले असून सुरगाणा पोलिस ठाणे येथे जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रकरणी पुढील तपासणी पोलिस निरिक्षक सुरगाणा यांच्याकडून सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मध्यान्ह भोजनाचे नमुने नित्कृष्ट असल्याबाबत

**(३७) * ६५०९२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळांमधील पटसंख्या सुधारावी यासाठी केंद्र व राज्यसरकारच्या संयुक्त निधीमधून दुष्काळग्रस्त जिल्ह्यातील तसेच मुंबई महानगरपालिकेतील शाळांमध्ये सुरू करण्यात आलेल्या मध्यान्ह भोजन योजनेच्या माध्यमातून मध्यान्ह आहार दिल्या जाणाऱ्या निवडक २९६ शाळांची तपासणी केली असता ६६ टक्के शाळामध्ये नियमितपणे शिजविलेले अन्न दिले जात नसल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखानिरिक्षक (कॅग) यांच्या अहवालात नमूद करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले असून, मुंबई महानगरपालिकेतील १८ शाळांमध्ये ८६ दिवस व चार शाळांमध्ये १४६ मुलांना शिजविलेले अन्न देण्यात आले नसल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकेच्या शाळेमध्ये सन २०१० ते २०१५ या कालावधीत स्वयंपाकाच्या खर्चापोटी ६ कोटी ८५ लाख रुपये देण्याऐवजी २३ कोटी ५१ लाख रुपये देण्यात आल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान केलेल्या परिक्षणात निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच शाळामध्ये मध्यान्ह भोजनाचे (खिचडी) चे काम इस्कॉन कंपनीला देताना, तांदूळ व अन्न शिजविण्यासाठी सर्व पैसे शासनाकडून मिळत असताना कंपनीने सदर भोजनासाठी भारतातून तसेच परदेशातून ३६ कोटी रुपयांची देणगी गोळा केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार याप्रकरणी मध्यान्ह भोजन पुरविणाऱ्या कंपनीवर तसेच त्यांना सवलत देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) महालेखापाल कार्यालयामार्फत सन २०१०-११ ते सन २०१४-१५ या कालावधीतील शालेय पोषण आहार योजनेचे संपादणूक लेखापरिक्षण करण्यात आले असून यामध्ये अशा स्वरुपाचा लेखा आक्षेप नमूद करण्यात आला आहे.
(४) देयकाबाबत ईस्कॉन फुड रिलीफ फाऊंडेशन यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून पुढील देयकांचे अधिदान मंजूर करण्यात आलेले नाही. ईस्कॉन फुड रिलिफ फाऊंडेशन ने जमा केलेल्या देणगीबाबत त्यांचेकडून खुलासा घेण्यात आला असून याबाबत केंद्र शासनाचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**हळदी, ताडाळा, कवळपेठ, दहेगाव व मानकापूर (ता.मूल, जि.चंद्रपूर) या गावातील पाणी पुरवठा बंद असल्याबाबत**

**(३८) * ६६७६२ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हळदी, ताडाळा, कवळपेठ, दहेगाव व मानकापूर (ता.मूल, जि.चंद्रपूर) या पाच गावात मूल जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेमार्फत चालविल्या जाणारा पाणी पुरवठा माहे जून, २०१६ पासून बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रार करण्यात येऊनही कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावांचा पाणी पुरवठा बंद करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर गावांचा पाणीपुरवठा तातडीने सुरु करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) होय.

तथापि, सदर पाच गावातील उपलब्ध सार्वजनिक विहीरी, हातपंपाद्वारे पाणी पुरवठा सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत बांधण्यात आलेल्या पुलाखाली सदर योजनेची गुरुत्वावाहीनी क्षतिग्रस्त झाली. त्यामुळे वरील पाचही गावांचा पाणी पुरवठा बंद झाला.
(४) ग्रामीण पाणीपुरवठा उपाविभाग, सिंदेवाही यांचेमार्फत पाईपलाईन दुरुस्तीच्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, निविदा प्रक्रियेत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) मुख्यालयात सह आयुक्त व सहाय्यक आयुक्त यांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने केलेली अटक

**(३९) * ७००२७ श्री.नारायण पाटील (करमाळा), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) मुख्यालयात सह आयुक्त हरीश बैजल यांना ४० हजार रूपयांची लाच घेताना व सहाय्यक आयुक्त प्रविण मुंदडा यांनाही औषध दुकानाचा परवाना रद्द करण्याची फाईल बंद करण्यासाठी रूपये ४० हजारांची लाच स्विकारतांना लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने प्रश्न भाग (२) मधील दुकानांवर केलेल्या कारवाईची सद्य:स्थिती काय आहे व लाच घेताना पकडलेल्या सह आयुक्त व सहाय्यक आयुक्तांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) श्री.प्र.ब.मुंदडा, सहायक आयुक्त (औषधे) अन्न व औषध प्रशासन यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दि.१४.०९.२०१६ रोजी रु.४०,०००/- रकमेची लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तथापि श्री.बैजल, सह आयुक्त (दक्षता) अन्न व औषध प्रशासन यांना लाच घेताना पकडण्यात आलेले नाही.
(२) होय. श्री.मुंदडा यांच्या विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील तरतुदीनुसार गु.र.क्र.५१/२०१६ दि.१४.०९.२०१६ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच दि.१६.०९.२०१६ च्या आदेशान्वये श्री.मुंदडा यांचे मानीव निलंबित करण्यात आले आहे. श्री.बैजल यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

तसेच या प्रकरणातील औषध विक्रेता पेढीचे परवाने परवाना प्राधिका-यांनी दि.१०.१०.२०१६ ते १६.१०.१६ या कालावधीकरिता निलंबित केले आहेत. या आदेशाविरुध्द सदर पेढीचे शासनाकडे अपिल दाखल केले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना वेतन मिळण्याबाबत

**(४०) * ६९२२१ श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सहा हजारापेक्षा जास्त विनाअनुदानित घोषित-अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये ३ हजाराहून अधिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असून हे सर्वजण १२ वर्षे वेतनापासून वंचित असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून १५ जून, २०१६ रोजी मंत्रीमंडळ बैठकीत या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी १६३ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले असून दोन दिवसात वेतनाचे वितरण करण्यात येईल असा निर्णय घेण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापही वेतन देण्यात आले नसल्यामुळे १५० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी इच्छामरण मागितले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) नाही.

(२) अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना सरसकट २० टक्के अनुदान देण्यास विहित अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली आहे.

(३) व (४) अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कांदिवली (मुंबई) येथील बीडीएच इंडस्ट्रीज लि.या कंपनीवर छापा टाकून पॅरासिटामॉल औषधाच्या बनावट गोळ्या जप्त केल्याबाबत

**(४१) * ६९७७६ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (मुंबई) येथील बीडीएच इंडस्ट्रीज लि.या कंपनीवर एफडीएच्या पथकाने टाकलेल्या छाप्यात ८० लाख रुपयांपेक्षा जास्त किंमतीच्या पॅरासिटामॉल औषधाच्या बनावट गोळ्या जप्त करण्यात आल्याची बाब दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरातमधील औषध कंपनीकडून कांदिवलीमध्ये पॅकिंग करण्याकरिता सदर गोळ्या आणण्यात आल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार कामगारांना अटक करुन मूळ मालकाला व कंपनीच्या संचालकाला अटक न करणाऱ्या तसेच सदर कंपनी तपास पूर्ण होईपर्यंत सील न करणाऱ्या एफडीएच्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) प्रशासनातर्फे दि. २९/०७/२०१६ व दि. ३०/०७/२०१६ रोजी मे. बीडीएच इंडस्ट्रीज लि., नायर बाग, आकुर्ली रोड, कांदिवली (पूर्व), मुंबई या संस्थेची तपासणी करण्यात आली होती. तपासणीच्यावेळी सदर संस्थेने मे.सिसमेड लॅबरोटरीज, वडोदरा, गुजरात यांनी उत्पादन केलेला सुमारे १६ लाख पॅरासिटामॉल औषधीचा बल्क साठा खरेदी करून तो स्वतःच्या नावाने पॅकींग/ लेबलींग करून ते स्वतः उत्पादन केल्याचे भासवून ते निर्यात करणार असल्याचे निदर्शनास आले. सदर औषधाचे नमुने चाचणी व विश्लेषणासाठी घेऊन उर्वरीत साठा दि. ३०/०७/२०१६ रोजी विक्रीसाठी प्रतिबंधित करण्यात आला. तद्नंतर दि. ०५/०८/२०१६ रोजी सदर औषधाचा रू. २,९०,०००/- किमतीचा साठा जप्त करण्यात आला. सदर साठा औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील कलम १७ ( बी) (ई) मध्ये नमूद करण्यात आलेल्या तरतूदीनुसार बनावट असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) तपासणीच्यावेळी निदर्शनास आलेल्या त्रुटींच्या आधारे मे. बीडीएच इंडस्ट्रीज लि., कांदिवली (पूर्व), मुंबई या संस्थेचे परवाने प्रशासनाच्या दि. २५/१०/२०१६ अन्वये दि. २६/१२/२०१६ पासून रद्द करण्यात आलेले आहेत.

सदर प्रकरणी आवश्यक चौकशी व तपास पूर्ण करून प्रशासनातर्फे सदर कंपनीचे संचालक व इतर सर्व संबंधितांविरोधात औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतील तरतुदीचे उल्लंघन केल्याप्रकरणी महानगर दंडाधिकारी, १५ वे माझगाव न्यायालय, शिवडी, मुंबई यांचे न्यायालयात खटला क्र. १५००१६२/ एसडब्लू/२०१६ दि. १७/१०/२०१६ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर कंपनीविरूध्द अत्यंत कठोर अशी कारवाई करण्यात आली असल्याने प्रशासनाच्या अधिका-यांविरूध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कारखान्यांमधून सोडण्यात येणाऱ्या घातक वायु व प्रदूषित सांडपाण्याबाबत**

**(४२) * ६५८७०  श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक कारखान्यांमधून सोडण्यात येणाऱ्या घातक वायुमुळे परिसरात कायम असलेल्या धुक्याच्या वातावरणामुळे औद्योगिक परिसरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याचे माहे सप्टेंबर २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच आसनपोई (ता. महाड, जि.रायगड) येथील एमआयडीसी विभागातील मे.लक्ष्मी ऑर्गेनिक्स इंडस्ट्रीज लि. कंपनीच्या होणाऱ्या प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असून कंपनीने नाल्यातून सोडलेल्या रासायनिक सांडपाण्यामुळे टेमघर नदीपात्रातील पाणी प्रदूषित होऊन हजारो मासे मृत्यूमुखी पडल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (२) मधील कंपनीच्या डायकेंटीन या उत्पादनामुळे नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्पपरिणामाबाबत प्राथमिक आरोग्य केंद्र, बिरवाडी-महाड यांनी केलेल्या सर्वेक्षणात अनेक नागरिक विविध आजारांनी ग्रस्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त औद्योगिक वसाहतीमध्ये बसविण्यात आलेली वायु प्रदूषण यंत्रणा बंद पडली असून उक्त औद्योगिक वसाहतीत अपघात कारवाई वगळता कारखान्यांवर प्रदूषणासंदर्भात कोणती कार्यवाही केली गेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त सर्व प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, कारवाईचे स्वरूप काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) विचाराधीन सर्वेक्षणानुसार औद्योगिक परिसरातील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याबाबतचे रुग्ण माहे सप्टेंबर २०१६ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्रातील बाहयरुग्ण विभागात आढळले नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड यांनी दिनांक २९.९.२०१६ रोजी कारखाना बंदचे निर्देश दिले. या बाबत सरपंच ग्राम पंचायत, आसनपोई यांनी देखील कारखाना योग्य ती खबरदारी घेत असल्यास उत्त्पादन पुन्हा चालू करण्याबाबत ग्रामपंचायतीची हरकत नसल्याबाबत मंडळाला कळविले. या अनुषंगाने सुनावणी घेऊन सदर कारखान्याने रु. १ लाख इतकी बँक हमी म.प्र.नि. मंडळाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच कारखान्यास दिनांक २.९.२०१६ रोजी देण्यात आलेल्या निर्देशानुसार रु.१५ लाख बँक हमी म.प्र.नि. मंडळाकडे सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

महाड औद्योगिक वसाहतीमधील मोठया व मध्यम स्वरुपाच्या कारखान्यांनी औद्योगिक सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्राथमिक, व्दितीय व काही कारखान्यांनी त्रिस्तरीय स्वरुपाची औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारली आहे. तसेच मोठया उद्योगांनी व मध्यम उद्योगांनी RO.MEE व Dryer सारख्या अत्याधुनिक प्रक्रिया संयंत्रणा उभारलेल्या आहेत व त्यामधून प्रक्रिया केलेले पाणी काही अंशी उद्योगांत पुन्हा वापर केले जाते व उर्वरित पुढील प्रक्रियेसाठी सीईटीपीला सोडले जाते. लहान स्वरुपाच्या कारखान्यांनी प्राथमिक स्वरुपाची औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील वाकोला येथील शास्त्रीनगर उर्दू माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थिनींशी केलेल्या गैरवर्तनाबाबत

**(४३) * ६५५९८ अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाकोला येथील शास्त्री नगर उर्दू माध्यमाच्या शाळेतील दोन

शिक्षकांनी त्यांच्याच शाळेतील १५ विद्यार्थीनींशी गैरवर्तन केल्याचे निदर्शनास आणणा-या शिक्षिकेला शाळेतून काढून टाकण्यात आल्याची बाब दिनांक २९ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिक्षकांविरोधात दिनांक २९ जुलै, २०१६ रोजी तक्रार दाखल करुन त्यांना तातडीने अटक करुन त्यांच्या विरुध्द कारवाई करण्याची मागणी शिक्षण समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीनुसार शाळा प्रशासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्याने ते दोषी शिक्षकांना पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त शाळेतील विद्यार्थीनींचे संरक्षण करण्यासाठी तसेच दोषी शिक्षकांना पाठीशी घालणा-या शाळा प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) सदर घटनेच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण समितीच्या सदस्या यांनी दि.२९.७.२०१६ रोजी सदर शाळेला भेट दिली होती. तद् नंतर दि.६.८.२०१६ अन्वये उपशिक्षणाधिकारी व अधिक्षक (शाळा) यांची समिती नेमून चौकशी करण्यात आली. चौकशीअंती तक्रार बनावट असल्याचे निष्पन्न झाले. सबब विद्यार्थिनीं मार्फत बनावट तक्रार करणाऱ्या दोषी शिक्षिकेविरुध्द शाळा प्रशासनाकडून कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे. दि.२९.८.२०१६ रोजी शिक्षण समितीच्या सभेमधे सदस्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी (जि.परभणी) येथील धान्य गोदामातील धान्याचा झालेला गैरव्यवहार

**(४४) * ६६४७५ श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस),**

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.प्रशांत बंब (गंगापूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी (जि.परभणी) तहसिल कार्यालयामार्फत गोदामातून रेशन दुकानांसाठी वाटप केल्या जाणाऱ्या गहू व तांदूळ या धान्याच्या वाटपामध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे व १९ हजार क्विंटल धान्य गायब झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हजारो क्विंटल धान्याच्या गैरव्यवहार प्रकरणी तहसिलदारांना निलंबित करण्यात यावे व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांची बदली करण्यात यावी असा प्राथमिक अहवाल परभणी जिल्हाधिकाऱ्यांनी विभागीय आयुक्तांकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) पुरवठा आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या पथकाने केलेल्या गोदाम तपासणी अहवालानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वितरीत करावयाच्या सुमारे १९१४१.८ क्विंटल अन्नधान्याचा परभणी येथील शासकीय गोदामातून अपहार झाल्याची बाब माहे ऑगस्ट २०१६ मध्ये निदर्शनास आली आहे.

(२), (३) व (४)

सदर प्रकरणात गु.र.नं. ३०५/१६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून एकूण १० आरोपींना अटक करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकरणी श्री अनिल आंबेराव, गोदामपाल परभणी, श्री सि.बी. पांचाळ, नायब तहसिलदार (पुरवठा) परभणी, श्री. संतोष रुईकर, तहसिलदार, परभणी यांना निलंबीत करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा पुढील तपास सुरु आहे.

-----------------

## मौजे भादोला (ता.जि. बुलडाणा) येथील नळ पाणी पुरवठा योजना बंद असल्याबाबत

**(४५) * ७०२३८ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुंदरखेड ते भादोला (ता.जि.बुलडाणा) ही पाईप लाईन निकृष्ट असल्याने मौजे भादोला (ता. बुलडाणा) येथील नळ पाणी पूरवठा योजना गत २० वर्षापासून बंद असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणच्या ग्रामस्थांना दरवर्षी तीव्र स्वरूपाच्या पाणी टंचाईस सामोरे जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त ठिकाणाचे निकृष्ट पाईप लाईन दुरुस्त करण्याबाबत व बंद असलेली नळ पाणी पुरवठा योजना सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

बुलडाणा परिसरात होणा-या कमी पर्जन्यमानामुळे येळगांव धरणातील अपु-या जलसाठयाअभावी बुलडाणा शहर व परिसरात पाणी टंचाई निर्माण होते. त्याकरीता, भुपृष्टीय शाश्वत स्त्रोत असलेला खडकपुर्णा प्रकल्प गृहीत धरुन बुलडाणा व ४ गावे पाणी पुरवठा योजनेमध्ये ग्रामीण भाग म्हणून मौ. भादोला या गावाचा संकल्पित वर्ष २०३२ ची लोकसंख्या गृहीत धरुन योजनेत समावेश करण्यात आला असून, योजनेस शासन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबईतील घाटकोपर व साकीनाका येथे बनावट साबणांचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांवर छापे टाकल्याबाबत**

**(४६) * ६७२५३ श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील घाटकोपर व साकीनाका येथे बनावट साबणांचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यांवर अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास छापे टाकले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर छाप्यात काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश बापट :** (१) दिनांक ०३/०८/२०१६ रोजी अन्न व औषध प्रशासनाच्या अधिका-यांनी पोलीसांसमवेत ४६, दिलीपकुंज, जिवदया लेन, आर बी कदम मार्ग, घाटकोपर, मुंबई-८६ या ठिकाणी धाड टाकली. या धाडीच्यावेळी मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रशासनाच्या अधिका-यांनी सायंकाळी साकीनाका येथील मे. फलाह इंडस्ट्रीज, एफ-३१/३२, शदाब कंपाऊंड, श्रीनगर, साकीनाका, मुंबई-०७२ या ठिकाणीही छापा टाकला.
(२) घाटकोपर येथील छाप्याच्या वेळी तेथे एक इसम डेटॉल या साबणाचे बनावट पॅकींग करीत असल्याचे निदर्शनास आले. तेथे असलेल्या बनावट साबणाच्या साठ्यामधून एक नमुना विश्लेषणासाठी घेण्यात येऊन उर्वरित रू. ७२,०००/- किमतीचा साठा व इतर वस्तु जप्त करण्यात आल्या सदर प्रकरणी संबंधित व्यक्तीविरोधात घाटकोपर पोलीस ठाण्यात प्रथम खबरी अहवाल क्र. ३६२/२०१६, दि. ०३/०८/२०१६ नोंदविण्यात आला आहे. पोलीसांनी संबंधितांस अटक केली असून पोलीसांकडून याप्रकरणीचा पुढील तपास सुरू आहे. तपास पूर्ण होताच संबंधिताविरोधात न्यायालयात खटला दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

साकीनाका येथील छाप्याच्या वेळी तेथे USWA व Cnha या साबणाचे विनापरवाना उत्पादन सुरू असल्याचे निदर्शनास आले. तेथे विनापरवाना उत्पादन करण्यात आलेला रू. २ लाख किमतीचा साठा जप्त करण्यात आला. सदर प्रकरणी पुढील तपास व चौकशी सुरू असून, तो पूर्ण होताच संबंधिताविरूध्द न्यायालयात खटला दाखल करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सापे तर्फे तुडील (ता.महाड, जि.रायगड) येथील नागेश्वरी नदीत एम.आय.डी.सीचे रसायनयुक्त पाणी शिरल्यामुळे स़दरहू नदी दूषित झाल्याबाबत

**(४७)** * **७१९९६ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सापे तर्फे तुडील (ता.महाड, जि.रायगड) येथील नागेश्वरी नदीत एम.आय.डी.सी.चे रसायनयुक्त पाणी शिरल्यामुळे स़दरहू नदी दूषित झाली आहे तसेच सदरहू गावाला उक्त नदीतून पिण्याचा पाणी पुरवठा केला जात असल्याने व पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन दुषित पाण्यामुळे खराब झाली असल्याने नागरीकांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागेश्वरी नदीमध्ये एम.आय.डी.सी.चे रसायनयुक्त पाणी जाऊ नये म्हणून रावढळ या ठिकाणी उन्हाळ्यात प्रत्येक वर्षी एक बंधारा बांधला जातो परंतू गत दोन वर्ष अशा प्रकारची कोणतीही उपाययोजना एम.आय.डी.सी. कडून केली गेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यासंदर्भात सापे तर्फे तुडील ग्रामपंचायत व ग्रामस्थांनी एम.आय.डी.सी., महाड कार्यालय, प्रांतधिकारी, महाड व तहसिलदार, महाड यांना दिनांक ३० मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन देऊन सुध्दा कोणत्याही प्रकारची उपायोजना एम.आय.डी.सी कडून झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने उक्त पाईप लाईन दुरुस्त करण्याबाबत व एम.आय.डी.सीचे रसायनयुक्त पाणी नदीत मिसळू नये यासंदर्भात बंधारा बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याप्रकरणी हलगर्जी करणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) लोअर तुडील ग्रामपंचायतीने माहे डिसेंबर, २०१५ मध्ये ओवळे गावानजिक बांधण्यात आलेल्या नागेश्वरी बंधाऱ्याचे बाजूचे भराव काही प्रमाणात वाहून गेल्याने व लोखंडी प्लेट गंजून खराब झाल्याने रसायनयुक्त पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे व शेतातील पिकांचे नुकसान होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींना निवेदन दिले होते.
(२) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील सांडपाणी नागेश्वरी खाडीमध्ये जावू नये म्हणून सन २००२-०३ मध्ये मौजे रावढळ येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत बंधारा बांधण्यात आला होता. सन २००७ पर्यंत सदर बंधाऱ्याची महामंडळाकडून नियमीत देखभाल व दुरुस्ती करण्यात येत होती. तद्नंतर सन- २००८ मध्ये महामंडळाकडून रोख रक्कम रु. २०,३३,३७५/- अदा करुन व करारनामा करुन सदर बंधारा पुढील देखभाल व दुरुस्तीसाठी ग्रामपंचायत लोअर तुडील यांच्याकडे कायमस्वरुपी हस्तांतरीत करण्यात आला आहे.
(३) व (४) ग्रामपंचायतीचा महसुल फार कमी असल्याने सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कामे ग्रामपंचायतील शक्य नसल्याने सदर बंधारा महामंडळास हस्तांतरीत करण्याबाबत ग्रामपंचायत लोअर तुडील यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींना निवेदन दिले होते. तथापि, औद्योगिक क्षेत्रातील सांडपाण्यावर महाड येथील सामायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्रात प्रक्रिया करुन पाणी सोडण्यात येते व सदर सांडपाणी योग्य मानांकनानुसार आहे किंवा कसे याची खातरजमा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नियमितपणे करण्यात येते. तसेच महामंडळाने औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी वाहिनी मे. राष्ट्रीय समुद्रीक विज्ञान संस्थेने दिलेल्या अहवालानुसार गोमंडी गावाजवळ पुढे खोल समुद्रात २.२ कि.मी. नविन बिंदूपर्यंत वाढविण्याचे काम हाती घेतले असून, सदरहू काम प्रगतीपथावर आहे व ते ऑक्टोबर, २०१७ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित

आहे. नागेश्वरी बंधारा ग्रामपंचायतीकडे कायमस्वरुपी हस्तांतरीत करताना केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार सदर बंधाऱ्याची देखभाल व दुरुस्तीचे काम करण्याची संपूर्ण जबाबदारी ग्रामपंचायतीची आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील डेव्हिड ससून ग्रंथालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीमध्ये होत असलेल्या दिरंगाईबाबत

**(४८) * ६५४८८ ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी ज्या इमारतीमध्ये बसून घटनेचे लिखाण केले त्या मुंबईतील ससून इमारतीचे दुरुस्तीचे काम प्रलंबित असून छतातून ठिबकणाऱ्या पाण्यामुळे एकूण २७ हजार पुस्तके जिर्ण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीच्या दुरुस्तीसाठी अनेक संस्थांकडून निधी येत असतानाही सद्या पदावर असलेले समिती सदस्य निधी घेण्यास नकार देत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, व त्यानुसार मौल्यवान वास्तूचे जतन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) डेव्हिड ससून लायब्ररी ॲन्ड रिडींग रूम हा न्यास एफ-१८६(मुं) या क्रमांकाने सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग, मुंबई या कार्यालयात दि. २३/०५/१९५२ रोजी नोंदणीकृत झाला आहे. सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई कार्यालयातील निरिक्षकांनी सदर न्यासाच्या उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत प्रत्यक्ष पाहणी करुन निरिक्षक अहवालात असे नमूद केले आहे की, पावसाच्या पाण्यामुळे लायब्ररी वरील बाजूच्या भितींच्या

रंगाचे खपले निघालेले दिसून आले आहेत. परंतू कपाटातील पुस्तके जीर्ण झाल्याचे दिसून आले नाही. तसेच न्यासाच्या विश्वस्तांनी खुलासा केला आहे की, “ग्रंथालयात असलेल्या पुस्तकांचा संग्रह हा त्यांच्यासाठी अमूल्य ठेवा आहे. पुस्तकांची देखभाल करण्याबाबत विश्वस्त अत्यंत जागरुक आणि संवेदनशील आहेत. तसेच त्यांच्याकडील पुस्तके जीर्ण झाल्याची माहिती अत्यंत खोटी व ऐकीव आहे, पुस्तक जीर्ण झाल्याची माहिती कोणत्याही प्रकारची पहाणी व शहानिशा न करता केलेला अनुमान आहे व त्यांच्याकडे असणारी पुस्तके एकदम सुरक्षित असून पावसाच्या पाण्याने जीर्ण झालेली नाहीत” असे विश्वस्तांचे म्हणणे आहे.

(२) विश्वस्तांनी जबाबात नमूद केले आहे की, ग्रंथालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीमध्ये असलेल्या दिरंगाईबद्दल घेतलेला आक्षेप पूर्णपणे खोटा व दिशाभूल करणारा आहे. न्यासाच्या समिती सदस्यांनी इमारतीच्या दुरुस्तीबाबत सतत पाठपुरावा केलेला आहे. काळाघोडा असोसिएशन कडून रु.२८लक्ष इतका निधी ग्रंथालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी आणि ३ लक्ष इतका साधारण निधी म्हणून ग्रंथालयास देण्याचे मान्य केले आहे. सदर काम हे अंतिम स्वरुपात असून कंत्राटदार सुचविण्याच्या सूचना विश्वस्तांना काळाघोडा असोसिएशन कडून मिळाल्या आहेत. येत्या नजीकच्या काळामध्ये इमारत दुरुस्ती करण्यात येणार असल्याने दुरुस्तीमध्ये असलेला दिरंगाईबाबतचा आक्षेप चुकीचा आहे. ग्रंथालयाच्या इमारतीच्या दुरुस्तीसाठी काळाघोडा असोसिएशन व्यतिरिक्त अन्य कोणत्याही संस्थेकडून प्रस्ताव आलेला नसल्याने तो नाकारण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## एव्हॉन लाईफ सायन्सेस या कंपनीतून जप्त करण्यात आलेल्या अंमली पदार्थाच्या चौकशीच्या अहवालाबाबत

**(४९) * ६५८५८ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.सिध्दराम म्हेत्रे (अक्कलकोट), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड),**

**श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **अन्न आणि औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एव्हॉन लाईफ सायन्सेस या कंपनीची अन्न व औषध प्रशासन विभागाचे दक्षता अधिकारी हरीष बैजल यांनी तपासणी करताना हेतूत: केलेल्या निष्काळजीपणाबद्दल अन्न व औषध प्रशासनातील सात अधिकाऱ्यांविरुध्द अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यातील ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात यावा अशी शिफारस अहवालात करुन सदर अहवाल अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त डॉ.हर्षदीप कांबळे यांना सादर केल्याची बाब दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल अभिप्रायाकरिता विधी व न्याय विभागाकडे पाठविल्यानंतर सदर विभागाने कारवाई करता येऊ शकत नाही असा अभिप्राय व्यक्त केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विधी व न्याय विभागाला अहवाल सादर करताना काही त्रुटी राहिल्याने विधी व न्याय विभागाचे तयार झालेले मत व सकृत दर्शनी संबंधित अधिकारी दोषी असूनही भविष्यात त्या अधिकाऱ्यांना न्यायालयात गेल्यावर त्रुटी राहिलेल्या अहवालाचा फायदा होऊ नये म्हणून अन्न व औषध प्रशासन विभागाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सकृतदर्शनी दोषी आढळलेल्या या सहा ते सात अधिकाऱ्यांनी अंमली पदार्थ प्रतिबंधक कायद्यातील तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाच्या सर्व नियमांची योग्य तऱ्हेने पालन न केल्याची खात्री झाल्याने हा सर्व तपास पोलीसांच्या आर्थिक गुन्हा अन्वेषण विभाग, सीआयडी किंवा सीबीआयकडे सोपविण्याबाबत शासनाने खास बाब म्हणून सदर प्रकरण हाताळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) होय.

(२) होय, तथापि या अधिकाऱ्यांवर कारवाई कारायची असल्यास याबाबत नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो या विहीत प्राधिकरणाचे अभिप्राय घेणे आवश्यक आहे, असेही अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत.

(३) विधी व न्याय विभागास सविस्तर अहवाल अभिप्रायासाठी सादर करण्यात आला होता. विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर कोणतीही संदिग्धता राहु नये म्हणुन प्रकरण मा.महाअधियोक्ता यांचे अभिप्राय घेण्यासाठी विधी व न्याय विभागामार्फत दि.२६.१०.२०१६ अन्वये सादर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे, सिंहगड रस्त्यावरील वडगाव बुद्रुक येथे 'गोयल गंगा डेव्हलपर्स'ने पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करून इमारतींचे बांधकाम केल्याबाबत

**(५०) * ६७३३३ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे सिंहगड रस्त्यावरील वडगाव बुद्रुक येथील सर्व्हे क्र. ३५ ते ४० मध्ये 'गोयल गंगा डेव्हलपर्स'ने १२ इमारतींनाच परवानगी असताना प्रत्यक्षात १५ इमारतींचे पर्यावरणाच्या नियमांचे उल्लंघन करून बांधकाम केल्याचे दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त डेव्हलपर्सने कायद्याचे उल्लंघन करून पर्यावरणाला बाधा पोहोचविली असल्याचे स्पष्ट मत व सदर इमारतीचे बांधकाम होत असताना महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचे 'एनजीटी'ने आपल्या आदेशात नोंदविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) व (२) प्रश्नामध्ये नमूद प्रकल्पाच्या बांधकामामध्ये सदरहू प्रकल्पास देण्यात आलेल्या पर्यावरण अनुमतीमधील अटी/शर्तींचे उल्लंघन संबंधित प्रकल्पाच्या प्रकल्प प्रवर्तकाने केल्याबाबत मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांच्याकडे ॲप्लीकेशन क्र.१८४/२०१५ दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये मा. न्यायालयाने दि.२७.०९.२०१६ रोजी याबाबतचे आदेश पारित केले आहेत. सदर आदेशास मा. न्यायालयाने दि.२७.०९.२०१६ रोजीच्या अन्य आदेशान्वये आठ (८) आठवड्याची स्थगिती दिली आहे.
(३) व (४) मा. राष्ट्रीय हरित लवाद, पुणे यांनी दिनांक २७/९/२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशांविरुध्द पुणे महानगरपालिका यांच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे अपिल क्र. १०९०१/२०१६ दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

**लोणेरे (ता.माणगाव, जि.रायगड) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील मुलींच्या धवलगिरी व मलयगिरी वसतीगृहाची झालेली दूरावस्था**

**(५१) * ६६०१३ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोणेरे (ता.माणगाव, जि.रायगड) येथील जागतीक स्तरावर प्रसिद्ध असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील मुलींच्या धवलगिरी व मलयगिरी वसतीगृहाची अवस्था अत्यंत दयनिय झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, छत गळतीने रूमच्या भिंती सतत ओल्या होत असल्याने होणारे दमट हवामान, तसेच पाणी शुद्धीकरण यंत्र बऱ्याच वेळा बंद असल्यामुळे टँकरने पुरविण्यात येणारे शेवाळयुक्त अशुद्ध पाण्यामुळे अनेक विद्यार्थीनींना कावीळ व टायफॉईडसारखे आजार तसेच अशुद्ध पाण्याच्या वापराने अंगावर पूरळ उठून त्वच्या रोग होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार तक्रार करुनही संबंधित व्यवस्थापनाकडून झालेल्या दुर्लक्षाबाबत विद्यापीठातील विद्यार्थीनींनी आंदोलनही केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे आरोग्य तसेच त्यांची होणारी गैरसोय तातडीने दूर करण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) वसतिगृहाच्या छताची गळती होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) विद्यापीठातील विद्यार्थिनींनी याअनुषंगाने तक्रारी केल्या होत्या.

(४) व (५) विद्यापीठाने छत दुरुस्तीचे काम प्रस्तावित आहे. पावसाळयात ४ ते ५ दिवस अपरिहार्य कारणास्तव टँकरने पाणी पुरवठा करण्यात आला होता. वसतीगृहात पुरेसे पाण्याचे फिल्टर बसविण्यात आलेले आहेत. याशिवाय विद्यापिठाने विद्यार्थिनींकरीता २४ तास रुग्णवाहिका सेवा उपलब्ध केली आहे, इत्यादी विविध उपाययोजना केल्या आहेत.

-----------------

## मुंबईतील उल्हास नदीच्या काठावरील प्रदूषण करणा-या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५२) * ६५७०० ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील उल्हास नदीच्या काठावर वसलेल्या १० उद्योग कंपन्यांकडून प्रदूषण होत असून या कंपन्यांनी प्रदूषण रोखण्यासंदर्भात अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्याने सदर कंपन्यांवर कारवाई करण्याचा आदेश राष्ट्रीय हरित लवादाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिले असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आदेशानूसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून १० कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

मा. राष्ट्रीय हरित लवाद, पूणे यांनी वनशक्ती पब्लीक ट्रस्ट वि. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व इतर याचिका क्रमांक ३७/२०१३ च्या अनुषंगाने दि. १४/०९/२०१६ रोजीच्या मा. राष्ट्रीय हरित लवाद यांच्या आदेशामध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने भेटी देवून पाहणी केलेल्या व विविध नियमांचे पालन न करणा-या उद्योगांवर केद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे असे नमूद केले आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे दोषी कारखान्यांवर हवा व जल प्रदूषण कायद्या अंतर्गत कारवाई केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.